

# देवा

## तू कोण आहेस?

आपल्या स्वर्गीय पित्याच्या हृदयात एक प्रवास

एनोक खंडागळे

# देवा, तू कोण आहेस?

आपल्या स्वर्गीय पित्याच्या हृदयात एक प्रवास

January 2026


## एनोक विनोद खंडागळे



ह्या पुस्तिकाचे मराठी भाषांतर भाऊ जोएल साळवी ह्यांनी केले आहे.


## अनुक्रमणिका


प्रस्तावना – देवा, तू कोण आहेस?.......... **2**

प्रकरण **1** – देवाविषयी चार गोष्टी.......... **3**

प्रकरण **2** – देव म्हणजे प्रेम.......... **5**

प्रकरण **3** – देव सहनशील आणि दयाळू आहे.......... **6**

प्रकरण **4** – देव मत्सर करत नाही, बढाई मारत नाही किंवा गर्विष्ठ नाही.......... **7**

प्रकरण **5** – देव आपल्याशी उद्धटपणे वागत नाही आणि स्वतःचा मार्ग लादत नाही.......... **9**

प्रकरण **6** – देव लवकर चिडत नाही, वाईटाचा विचार करत नाही.......... **10**

प्रकरण **7** – देव अधर्मात आनंद मानत नाही, पण सत्यात आनंद मानतो.......... **11**

प्रकरण **8** – देव सर्व काही सहन करतो, सर्व गोष्टींवर विश्वास ठेवतो, सर्व गोष्टींची आशा बाळगतो, सर्व काही सोसतो.......... **13**

प्रकरण **9** – देव कधीही अपयशी ठरत नाही.......... **14**

प्रकरण **10** – या तिघांपैकी सर्वात महान म्हणजे प्रेम.......... **16**

प्रकरण **11** – आपल्या संपूर्ण हृदयाने, मनाने, आत्म्याने आणि सामर्थ्याने प्रभूवर प्रेम करणे.......... **18**

प्रकरण **12** – एकमेकांवर प्रेम करा.......... **20**

प्रकरण **13** – जगाचे प्रेम.......... **21**

प्रकरण **14** – देव आणि मानव.......... **24**

प्रकरण **15** – देव आणि तुम्ही.......... **26**

## प्रस्तावना – देवा, तू कोण आहेस?

देवा, तू कोण आहेस? हा प्रश्न शंका, बंडखोरी किंवा अविश्वासातून जन्मलेला नाही. हा मानवी हृदय विचारू शकणारा सर्वात प्रामाणिक प्रश्न आहे. प्रत्येक पिढीने, प्रत्येक संस्कृतीने आणि प्रत्येक आत्म्याने धार्मिक असो वा नसो कधी ना कधी या प्रश्नाशी झगडले आहे. देव खरोखर कोण आहे? तो कसा आहे? त्याच्यावर विश्वास ठेवता येतो का? तो प्रेमळ आहे की दूरस्थ? सहनशील आहे की लवकर रागावणारा? तो आपले भले इच्छितो की केवळ आपली आज्ञाधारकता मागतो?

हे पुस्तक लिहिले गेले कारण त्या प्रश्नाचे उत्तर जीवनातील इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. बायबल अतिशय थक्क करणाऱ्या साधेपणाने घोषित करते, “देव प्रेम आहे” (१ योहान ४:८; १ योहान ४:१६). तरीही अनेकांसाठी हे सत्य अजूनही अमूर्त, गैरसमजलेले, किंवा भीती, अपराधभावना आणि देवाच्या विकृत प्रतिमांखाली दबलेले राहते. आपण आपल्या ओठांनी देव प्रेम आहे असे कबूल करतो, पण आपल्या अंतःकरणात खोलवर आपण हे मान्य करण्यात संघर्ष करतो की तो खरोखरच आपल्याशी सहनशील आहे, आपल्याकडे दयाळूपणे पाहतो, आपल्या व्यवहारात सौम्य आहे, आणि आपण अपयशी ठरलो तरीही विश्वासू राहतो.

या पुस्तकाचा उद्देश त्या एकाच, सामर्थ्यशाली सत्याला म्हणजे देव प्रेम आहे ह्याला घेऊन शास्त्राला स्वतःच स्वतःचे स्पष्टीकरण देऊ देणे हा आहे. तत्वज्ञान, परंपरा किंवा वैयक्तिक मतांवर आधारित युक्तिवाद उभारण्याऐवजी, ही प्रकरणे फक्त बायबलला देवाचे हृदय आणि स्वभाव उघड करू देतात. १ करिंथकर १३ या अध्यायाला प्रेमाचे आणि त्यामुळे स्वतः देवाचे दैवी वर्णन म्हणून वापरून, आपण श्लोकानुश्लोक काळजीपूर्वक पाहू की देव मानवजातीशी आणि वैयक्तिकरित्या तुमच्याशी खरोखर कसा आहे. हे पुस्तक वाचकाला दोषी ठरवण्यासाठी, आरोप करण्यासाठी किंवा ओझे टाकण्यासाठी लिहिलेले नाही. ते बरे करण्यासाठी, पुनर्स्थापित करण्यासाठी आणि आमंत्रण देण्यासाठी लिहिलेले आहे. अनेक लोक देवापासून दूर गेले आहेत कारण त्यांनी त्याचा द्वेष केला म्हणून नव्हे, तर त्यांनी त्याच्याविषयी खोटे चित्र विश्वासाने स्वीकारले म्हणून. इतिहासाच्या सुरुवातीपासून, सर्वात मोठी लढाई ही केवळ आज्ञाधारकता किंवा वर्तनाबद्दल नव्हती तर ती विश्वासाबद्दल होती.

सैतानाचे सर्वात मोठे खोटे नेहमीच देवाच्या स्वभावाविषयी राहिले आहे. हे पुस्तक त्या खोट्याला सत्याने सामोरे जाण्यासाठी अस्तित्वात आहे. तुम्ही वाचत असताना लक्षात येईल की ही यात्रा संथ आणि जाणीवपूर्वक पुढे जाते. प्रेम घाई करत नाही. सत्य जबरदस्तीने लादले जात नाही. देव स्वतः सहनशील आणि दयाळू आहे, आणि हे पुस्तक त्याच लयीचे प्रतिबिंब आहे. प्रत्येक प्रकरण मागील प्रकरणावर उभारलेले आहे, आणि एकच स्पष्ट चित्र तयार करते: देव प्रेम आहे, तो अनंतकाळापासून तसाच आहे, तो बदलत नाही, आणि त्याच्या स्वभावात किंचितसुद्धा फिरण्याची सावली नाही.

शेवटी, हे पुस्तक केवळ देवाविषयी नाही तर हे पुस्तक देव आणि तुम्हांविषयी आहे. तो तुम्हांविषयी कसा विचार करतो, तुमच्याशी कसा संबंध ठेवतो, तुमच्या अपयशांना, तुमच्या शंकांना, तुमच्या प्रश्नांना आणि अर्थाच्या शोधाला तो कसा प्रतिसाद देतो याविषयी आहे. हे भीतीवर आधारित धर्मातून बाहेर पडून, प्रेम आणि विश्वासावर आधारित नातेसंबंधाकडे जाण्याचे आमंत्रण आहे. जर हे पुस्तक तुम्हाला देव अधिक स्पष्टपणे पाहायला मदत करेल, त्याच्यावर अधिक खोलवर विश्वास ठेवायला शिकवेल, आणि त्याच्यावर अधिक मोकळेपणाने प्रेम करायला मदत करेल तर त्याचा उद्देश पूर्ण झाला आहे. माझी प्रार्थना आहे की या पानांतून जाताना, तुला अधिक कठोर देव नव्हे तर अधिक दयाळू देव सापडावा; दूरचा देव नव्हे तर जवळचा देव सापडावा; हार मानणारा देव नव्हे तर ज्याचे प्रेम कधीही अपयशी ठरत नाही असा देव सापडावा. ही यात्रा तुम्हाला देवाच्या हृदयात घेऊन जावो. - एनोक विनोद खंडागळे

# प्रकरण 1 – देवाविषयी चार गोष्टी

माझी पत्नी आणि मी लहानपणापासून एकमेकांना ओळखत होतो. मात्र जेव्हा मी तिच्या पालकांकडे तिचा विवाह माझ्याशी लावून देण्याची विनंती केली, तेव्हा त्यांनी आपली मुलगी मला द्यावी की नाही याचा निर्णय घेण्यासाठी तब्बल पाच वर्षे घेतली. पण नंतर मला त्यांच्या संकोचाचे कारण समजले, कारण विवाह ही आयुष्यभराची बांधिलकी असते आणि तिचा निर्णय अत्यंत काळजीपूर्वक विचार करूनच घ्यावा लागतो.

परंतु देवासोबतचे अनंत जीवन हे विवाहापेक्षा कितीतरी महान आहे आणि त्यासाठी आपल्याकडून आणखी खोल विचार व लक्ष अपेक्षित आहे. दुर्दैवाने, आपण देव कोण आहे याचा खरा विचार करण्यासाठी फारसे थांबत नाही. ज्याच्यासोबत आपण अनंतकाळ घालवण्याची आशा ठेवतो त्या स्वर्गाच्या राजाला ओळखणे अत्यावश्यक नाही काय? आणि येथे माझा अर्थ केवळ त्याच्याबद्दल मूलभूत माहिती असणे असा नाही, तर त्याचा स्वभाव, त्याचे विचार आणि आपल्याविषयीची त्याची कृत्ये समजून घेणे हा आहे.

भविष्यवक्त्या एलेन जी. व्हाईट यांनी त्यांच्या *Patriarchs and Prophets* या पुस्तकाच्या पृष्ठ 33.1 वर, काही बायबल वचनांना एकत्र जोडून देवाविषयी एक अतिशय सखोल विधान केले आहे. त्या म्हणतात, “देव प्रेम आहे.” (1 योहान 4:16). त्याचा स्वभाव, त्याचा नियम म्हणजे प्रेम आहे. तो नेहमीच असा आहे; तो नेहमीच तसाच राहील. “जो उच्च व उदात्त असून अनंतकाळात वास करतो,” ज्याचे “मार्ग अनंतकाळचे आहेत,” तो बदलत नाही. त्याच्यामध्ये “कसलाही बदल नाही किंवा परिवर्तन नाही.” (यशया 57:15; हबक्कूक 3:6; याकोब 1:17)

या विधानावरून आणि बायबल वचनांवरून आपण देवाबद्दल चार पैलू शिकतो:

1. देव प्रेम आहे — **1** योहान **4:16**
2. देव अनंत आहे — यशया **57:15**
3. त्याचे मार्ग अनंतकाळचे आहेत — हबक्कूक **3:6**
4. देवाच्या स्वभावात किंचितही बदल होत नाही — याकोब **1:17**

निश्चितच देव सर्वशक्तिमान, सर्वव्यापी आणि सर्वज्ञ आहे; पण देवाचे हे पैलू नीट, काळजीपूर्वक आणि पुरेसा वेळ देऊन अभ्यासले नाहीत, तर त्यांचा पूर्णपणे गैरसमज होऊ शकतो आणि आपण अनेक चुकीच्या निष्कर्षांपर्यंत पोहोचू शकतो. म्हणूनच सध्या आपण त्या विषयांना बाजूला ठेवूया.

तथापि, या टप्प्यावर पोहोचल्यानंतर तुम्ही असा प्रश्न विचारू शकता,
“देव प्रेम आहे, तो अनंत आहे, त्याचे मार्ग अनंतकाळचे आहेत, किंवा त्याच्या स्वभावात कसलाही बदल होत नाही — हे शिकल्यानंतर याचा मला नेमका काय फायदा होतो किंवा ते माझ्याशी कसे संबंधित आहे?”

आता तुम्ही आतापर्यंत कधीही न भेटालेल्या सर्वात अद्भुत अस्तित्वाला अधिक खोलवर जाणून घेण्यासाठी तयार व्हा.

## १. देव प्रेम आहे: आपल्या मूल्य आणि आशेचा पाया

देव प्रेम आहे याचा अर्थ असा की प्रेम ही फक्त तो करतो अशी एखादी गोष्ट नाही, तर प्रेम हेच त्याच्या मूळ स्वरूपात

तो कोण आहे ते आहे (१ योहान ४:८). हे सत्य आपल्यासाठी लाभदायक आहे कारण ते आपले मूल्य आपल्या कामगिरीवर, आज्ञाधारकतेवर किंवा समजुतीवर आधारित न ठेवता, थेट देवाच्या स्वभावावर आधारित ठेवते. आपण प्रेमात आहोत कारण देव प्रेम आहे, आपण प्रेम करण्यायोग्य आहोत म्हणून नव्हे. यामुळे विश्वासणाऱ्याला खोल खात्री मिळते: परिस्थिती वेदनादायक असली, किंवा विश्वास कमकुवत वाटत असला, तरीही देवाची आपल्याकडे पाहण्याची भूमिका प्रेमाचीच राहते. त्याच्या आज्ञा, त्याचे न्यायनिवाडे आणि त्याचे शिस्तीचे कार्य हे सर्व प्रेमातूनच वाहते कधीही क्रूरतेतून किंवा उदासीनतेतून नाही. हे जाणणे आपली आशा दृढ करते आणि आपल्याला भीतीपासून मुक्त करते, कारण आपण शिकतो की देव जे काही करतो ते शेवटी प्रेमानेच घडवलेले असते यावर विश्वास ठेवावा. (१ योहान ४:८–१०; रोमकर ८:३८–३९; योहान ३:१६)

## २. देव अनंत आहे: त्याचे प्रेम कधी सुरू झाले नाही आणि कधीच संपणार नाही

बायबल याबद्दल अगदी स्पष्टपणे सांगते. देव अनंत आहे, आणि म्हणूनच आपल्याला त्याच्यासोबत कायमचे राहण्याची संधी आहे. देव अनंत आहे म्हणून त्याचे प्रेम मानव निर्माण करताना सुरू झालेले नाही, तसेच ते काळावर अवलंबून असलेल्या घटनांवरही आधारित नाही (स्तोत्र ९०:२). तो अनादीकाळापासून अनंतकाळापर्यंत प्रेम करीत आला आहे. हे आपल्यासाठी लाभदायक आहे कारण यामुळे आपल्याला खात्री मिळते की देवाचे आपल्यावरील प्रेम प्रतिक्रियात्मक किंवा तात्पुरते नाही. आपण त्याच्यासाठी एखादी नंतरची कल्पना नव्हतो, आणि आपण त्याच्याकडे वळल्यानंतरच त्याने आपल्यावर प्रेम करायला सुरुवात केली असेही नाही. शास्त्र शिकवते की जगाचा पाया घातल्या जाण्यापूर्वीच देवाने आपल्यावर आपले प्रेम ठेवले, म्हणजेच त्याचे प्रेम आपल्या अस्तित्वापूर्वीचे आहे आणि आपल्या अपयशांपलीकडे टिकणारे आहे. हे अनंत प्रेम अढळ सुरक्षितता देते: ज्याला सुरुवात नाही त्याला शेवटही असू शकत नाही. विश्वासणारा या खात्रीत विश्रांती घेऊ शकतो की देव काळानुसार थकणार नाही, कंटाळणार नाही किंवा दूर जाणार नाही. (यिर्मया ३१:३; इफिसकर १:४–५; स्तोत्र १०३:१७)

## ३. देवाचे मार्ग चिरंतन आहेत: त्याचे आपल्यासाठीचे हेतू नेहमी विश्वासयोग्य असतात

देवाचे मार्ग चिरंतन आहेत म्हणजे त्याची तत्त्वे, उद्देश आणि वचने सर्व पिढ्यांमध्ये सुसंगत राहतील (यशया ४०:२८). हे आपल्याला बदलत्या जगात स्थिरता देते. मानवी व्यवस्था, नीतीमूल्ये आणि नातेसंबंध बदलतात, पण देवाचे मार्ग बदलत नाहीत. त्याने जे चांगले घोषित केले ते चांगलेच राहते; त्याने जे वचन दिले ते खरेच राहते. त्याचे मार्ग चिरंतन असल्यामुळे आपण खात्रीने विश्वास ठेवू शकतो की त्याचे मार्गदर्शन कधीही आपल्याला भरकटवणार नाही आणि त्याची वचने कधीही कालबाह्य होणार नाहीत. अनिश्चितता, दुःख किंवा सांस्कृतिक गोंधळाच्या काळात, विश्वासणारे आत्मविश्वासाने आपले जीवन देवाच्या मार्गांशी जुळवू शकतात, कारण ते तात्पुरत्या प्रवाहांवर नव्हे तर अनंत ज्ञानावर आधारित असतात. तुमच्या आरोग्याबद्दल असो, कौटुंबिक जीवनाबद्दल, व्यवसायाबद्दल किंवा करिअरबद्दल—देवाची तत्त्वे आणि त्याचे मार्ग नेहमीच तुमच्यासाठी सर्वोत्तम ठरतील. (स्तोत्र ७७:१३; यशया ५५:८–९; मत्तय २४:३५)

## ४. देव बदलत नाही: तो आपल्या विश्वासाची खात्री आणि शांततेचा पाया आहे

देवाचा न बदलणारा स्वभाव याचा अर्थ असा की तो पूर्णपणे विश्वासू आणि सुसंगत आहे (मलाखी ३:६). हे आपल्याला खात्री देते की उद्या देव नेमका तोच असेल जो तो आज आहे. तो आपले निष्कर्ष बदलणार नाही, आपले प्रेम मागे घेणार नाही किंवा आपल्या वचनांना विरोध करणार नाही. जर देव बदलू शकला असता, तर आपला विश्वास अस्थिर झाला असता; तारण अनिश्चित झाले असते; आणि आशा नाजूक बनली असती. परंतु त्याच्या स्वभावात अगदी किंचितसुद्धा बदल नसल्यामुळे आपण त्याच्यावर पूर्णपणे विश्वास ठेवू शकतो. त्याची दया नेहमी दयाच राहील, त्याचा न्याय नेहमी न्याय्यच राहील, आणि त्याचे प्रेम नेहमी शुद्धच राहील. ही अपरिवर्तनीयता विश्वासणाऱ्याच्या हृदयात शांतता आणते, विशेषतः शंका, दुःख किंवा अपयशाच्या काळात, कारण

देवाची आपल्याशी असलेली बांधिलकी आपल्या सातत्यावर नव्हे तर त्याच्या सातत्यावर अवलंबून असते. (मलाखी ३:६; याकोब १:१७; इब्री लोकांस १३:८)

देवाविषयीची ही सत्ये शिकणे नक्कीच तुम्हाला बायबल जेव्हा म्हणते देव प्रेम आहे याचा अर्थ अधिक जाणून घ्यायला प्रेरित केले असेल. पुढील प्रकरणात, आपण या सत्यांमध्ये आणखी खोलवर जाणार आहोत.

## प्रकरण 2 – देव = प्रेम

जसे सस्तन प्राणी, पक्षी आणि मासे यांना "प्राणी" म्हणतात, आणि तुमच्यासारखे-माझ्यासारखे अस्तित्व असणाऱ्यांना "मानव" म्हणतात, तसेच स्वर्गीय अस्तित्वांच्या समूहाला "देवदूत" म्हणतात. त्याचप्रमाणे, सर्वांपेक्षा श्रेष्ठ, आपल्याला निर्माण करणारा, आपले पालन-पोषण करणारा आणि आपली काळजी घेणारा सर्वशक्तिमान "प्रेम" म्हणून ओळखला जातो.
होय, प्रेम — केवळ देव नव्हे.

धर्म, जात आणि भाषा यांच्या पलीकडे जाऊन मानवजातीने सर्वशक्तिमानाला एका शब्दाने ओळखले आहे — "देव". पण बायबल आपल्याला यापेक्षा अधिक खोल सत्य सांगते: देव म्हणजे प्रेम. आपण त्याच्यामुळे अस्तित्वात आहोत, त्याच्यामध्ये जगतो आणि त्याच्या कोमल काळजीखाली आहोत, म्हणून त्याला प्रेम असे म्हटले जाते.

मानवतेत जर चांगुलपणा असेल, निसर्गात जर सुसंवाद असेल, किंवा देवदूतांमध्ये जर पवित्रता असेल, तर ते देव म्हणजे प्रेम असल्यामुळे आहे. त्याचे प्रेममय स्वरूप आणि तत्त्वे सजीव-निर्जीव अशा संपूर्ण सृष्टीतून वाहतात आणि सर्वकाही त्याच्या दैवी काळजीत एकत्र बांधून ठेवतात.

नक्कीच, बायबलमधील देवाला त्याच्या विविध गुणधर्मांचे आणि वैशिष्ट्यांचे वर्णन करण्यासाठी अनेक नावे दिली गेली आहेत. पण आपण देवाच्या स्वभावाशी — म्हणजेच प्रेमाशी — त्यांची गल्लत करू नये. हेच त्याला जगातील तथाकथित इतर देवांपासून वेगळे ठरवते. त्याच्याकडून वाहणारे खरे आणि प्रामाणिक प्रेमच त्याचे मन, स्वभाव आणि व्यक्तिमत्त्व इतके वेगळे आणि अद्वितीय बनवते.

"देव प्रेम आहे." १ योहान ४:१६ हे बायबलमधील अतुलनीय वचनांपैकी एक आहे. बायबल स्वतःच या वचनाचा कसा अर्थ लावते ते मी तुम्हाला दाखवू इच्छितो.

१ करिंथकरांस पत्र, अध्याय १३ मध्ये बायबल प्रेम काय आहे याचे वर्णन करते. पण एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, १ योहान ४:१६ आणि १ करिंथकरांस १३ या दोन्ही ठिकाणी प्रेमासाठी वापरलेला शब्द ग्रीक भाषेतील “आगापे” आहे—ज्या भाषेत बायबल मूळतः लिहिले गेले. म्हणजेच, या दोन्ही ठिकाणी “प्रेम” (ग्रीकमधील आगापे) हा शब्द अगदी तोच आहे. याचा अर्थ असा की, जेव्हा बायबल आपल्याला सांगते की देव प्रेम (आगापे) आहे, तेव्हा १ करिंथकरांस १३ मध्ये प्रेम (आगापे) विषयी जे काही लिहिले आहे, ते प्रत्यक्षात देवाबद्दलच सांगत आहे.

या समजुतीसह, आता १ करिंथकर १३ मध्ये जिथे-जिथे ‘प्रेम’ हा शब्द येतो, तिथे ‘देव’ हा शब्द ठेवून आपण ते प्रकरण वाचूया आणि काय उघड होते ते पाहूया.

पण त्याआधी, ते जसे लिहिले आहे तसेच आपण ते वाचूया.

प्रीती सहनशील आहे, परोपकारी आहे; प्रीती हेवा करत नाही; प्रीती बढाई मारत नाही, फुगत नाही; ती गैरशिस्त वागत नाही, स्वार्थ पाहत नाही, चिडत नाही, अपकार स्मरत नाही; ती अनीतीत आनंद मानत नाही, तर सत्यासंबंधी आनंद मानते; ती सर्वकाही सहन करते, सर्वकाही खरे मानण्यास सिद्ध असते, सर्वांची आशा धरते, सर्वासंबंधाने धीर धरते.. — १ करिंथकर १३:४–७ (MARVBSI आवृत्ती)

आपण ही बायबल वचने वाचतो तेव्हा आपल्याला वाटते की पौल आपल्याला आपण जीवन कसे जगावे याविषयी आज्ञा देत आहे. होय, तो तसे करतो आहे. पण त्याहून अधिक, तो आपल्याला देवाचा स्वभाव कसा आहे हे दाखवत आहे. आता ‘प्रीती’ या शब्दाऐवजी ‘देव’ हा शब्द ठेवून ही वचने आपण काळजीपूर्वक वाचूया, जेणेकरून त्यांचा अर्थ आपण अधिक चांगल्या प्रकारे आणि अधिक पूर्णपणे समजू शकू.

बदललेली आवृत्ती:

देव सहनशील आणि दयाळू आहे. देव हेवा करत नाही, बढाई मारत नाही, गर्विष्ठ नाही, उद्धट नाही. देव स्वतःचा मार्ग मागत नाही. तो लवकर चिडत नाही किंवा रागावत नाही, आणि त्याच्यावर झालेल्या अन्यायाची नोंद ठेवत नाही. देव अधर्मात आनंद मानत नाही, तर सत्यात आनंद मानतो. देव सर्व काही सहन करतो, सर्व गोष्टींवर विश्वास ठेवतो, सर्वांची आशा धरतो, सर्व काही सहन करतो. देव कधीही हार मानत नाही. — १ करिंथकर १३:४–७ (MARVBSI आवृत्ती)

आजपर्यंत कदाचित तुम्हाला १ करिंथकर १३ मधील प्रेमाचे गुण फक्त आज्ञा म्हणूनच शिकवले गेले असतील. पण मी तुम्हाला एक गोष्ट सांगू इच्छितो: हा उतारा फक्त प्रेम काय आहे किंवा देव कोण आहे याविषयीच बोलत नाही, तर देव तुमच्याविषयी आणि माझ्याविषयी कसे विचार करतो आणि आमच्याशी कसा वागतो हे सांगतो. पुढील प्रकरणात आपण ही वचने वेगवेगळी करून, हळूहळू, ध्यानपूर्वक मनाने वाचणार आहोत.

पण कृपया लक्षात ठेवा की जेव्हा जेव्हा तुम्ही 'प्रेम - प्रीती' हा शब्द वाचाल, तेव्हा तो देवाविषयी बोलत आहे, कारण देव म्हणजे प्रेम आहे.

## प्रकरण 3 – देव सहनशील आणि दयाळू आहे

प्रीती सहनशील आहे, परोपकारी आहे १ करिंथ १३:४ येशूने एकदा एक गोष्ट सांगितली जी देवाविषयी आपल्या कठोर कल्पना शांतपणे उधळून लावते ती म्हणजे उधळ्या पुत्राची गोष्ट. वडिलांपासून दूर असलेले जीवन निवडून आणि आपली वारसा संपत्ती उधळून टाकल्यानंतर, तो मुलगा शेवटी घरी परतण्याचा निर्णय घेतो. अशा रीतीने त्याने भीती आणि स्वार्थाने घडवलेली एक माफी मनात तयार केली. पण तो अजून दूर असतानाच काहीतरी आश्चर्यकारक घडले: “तो दूर आहे तोच त्याच्या बापाने त्याला पाहिले. त्याला त्याचा कळवळा आला आणि धावत जाऊन त्याच्या गळ्यात गळा घालून त्याने त्याचे मुके घेतले.” (लूक १५:२०).

इथेच सहनशीलता आणि दयाळूपणा एकत्र येतात. वडिलांना रागावण्याची सर्व कारणे होती. त्यांचा अपमान झाला होता, त्यांना नाकारले गेले होते, आणि ते दुखावले गेले होते. तरीही, त्यांनी वाट पाहिली. त्यांनी रस्त्याकडे लक्ष ठेवले. त्यांनी शांततेत आशा धरून ठेवली. ही वाट पाहणे म्हणजे सहनशीलता होती. पण इथे सहनशीलता एकटी धावत नाही. पित्याचा दयाळूपणा देखील आपल्या मुलाकडे धावतो. वडिलांनी फक्त मुलाच्या निर्णयाला सहन केले नाही; तर त्यांनी प्रेमाने त्याच्याकडे पुढे पाऊल टाकले, स्पष्टीकरणाआधी प्रतिष्ठा परत दिली, आणि पश्चात्ताप पूर्णपणे व्यक्त होण्याआधीच नातेसंबंध पुनर्स्थापित केले.

अनेक प्रकारे, आपणच उधळे पुत्र आणि कन्या आहोत. त्याच्यासारखेच, आपण निवडी करतो कधी जाणीवपूर्वक, कधी निष्काळजीपणे ज्या आपल्याला पित्याच्या हृदयापासून दूर नेतात. आपण स्वातंत्र्य, आनंद, यश किंवा नियंत्रण यांचा पाठपुरावा करतो, आणि असा विश्वास ठेवतो की आपल्या अटींवर जगल्यास जीवन अधिक परिपूर्ण होईल. आपण परत येतो तेव्हासुद्धा, आपले हेतू अनेकदा मिसळलेले असतात. आपण परत येतो कारण आपण थकलो असतो, तुटलेलो असतो, घाबरलेलो असतो किंवा गरजेमध्ये असतो नेहमीच कारण आपले हृदय शुद्ध असते असे नाही. तरीही ही गोष्ट असे सत्य उघड करते जे स्वीकारणे आपल्यासाठी कठीण जाते: देवाचे प्रेम परिपूर्ण पश्चात्तापामुळे उद्भवत नाही. ते त्याच्या स्वभावातून वाहते.

शास्त्र आपल्याला सांगते, “परमेश्वर दयाळू व कृपाळू आहे, तो मंदक्रोध व दयामय आहे” (स्तोत्र १०३:८). देवाची सहनशीलता याचा अर्थ असा आहे की आपण त्याच्या इच्छेच्या विरुद्ध चाललो तरी तो आपल्याला सोडून देत नाही. त्याचा दयाळूपणा याचा अर्थ असा आहे की आपण जखमी आणि अनिश्चित अवस्थेत परत आलो तरी तो आपल्याला लज्जित करत नाही. आपल्या पापी जीवनातसुद्धा, आपल्या हृदयाच्या दूर देशांत आपण रेंगाळत असतानासुद्धा, स्वर्ग न्याय लावत नाही याउलट तो करुणेने आपली वाट पाहतो.

प्रेरित पौल लिहितो, “किंवा देवाची ममता तुला पश्चात्तापाकडे नेणारी आहे हे न समजून तू त्याची ममता, क्षमा व सहनशीलता ह्यांच्या विपुलतेचा अनादर करतोस काय?” (रोमकर २:४). आपण अनेकदा असे गृहित धरतो की भीती आपल्याला बदलते, पण देव जाणतो की दयाळूपणामुळेच हृदय निर्मळ होते. प्रेम आपल्याला घरी परत आणते.

तरीसुद्धा, आपण देवाविषयी एक विचित्र चित्र मनात बाळगतो रागीट, अधीर, लवकर दुखावणारा. हे विकृत चित्र देवाला दुखावते, कारण ते त्याच्या हृदयाचे चुकीचे प्रतिनिधित्व करते, आणि ते आपल्यालाही दुखावते, कारण ते आपल्याला लपून राहायला भाग पाडते. पण शास्त्र आपल्याला सौम्यपणे दुरुस्त करते:
“प्रीती सहनशील आहे” (१ करिंथकर १३:४). देव प्रेम आहे, आणि प्रेम सहनशीलही आहे आणि दयाळूही आहे ते हि एकाच वेळी. पिता अजूनही त्या वाटेकडे पाहत आहे. हात दुमडून नाही, तर उघड्या हृदयाने. आपण दूर असलो तरी

किंवा अपूर्ण हेतूंनी परत फिरत असलो तरी, तो आपल्याला अशा प्रेमाने भेटतो जो प्रेम वाट पाहतो आणि मग धावत आपल्याकडे येतो.

## प्रकरण 4 – देव मत्सर करत नाही, बढाई मारत नाही किंवा गर्विष्ठ नाही

देव आपल्याविषयी मत्सर करत नाही. हे वचन आपल्याला सांगते की देव आपल्या प्रगतीबद्दल असुरक्षित किंवा मत्सर ठेवत नाही. आपली वाढ, आपली बढती, किंवा आपले यश त्याला धोका वाटत नाही. उलट, देव आपल्या भरभराटीची इच्छा करतो. तो आपल्यासाठी चांगल्या गोष्टी ठरवतो, वाईट नाही, आणि तो आपल्याला आशेने भरलेल्या भविष्याकडे बोलावतो: "परमेश्वर म्हणतो, तुमच्याविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हांला तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत." — यिर्मया २९:११

मत्सर किंवा असुरक्षित असलेला कोणीही इतरांच्या यशाला घाबरेल; पण देव आपल्या मुलांना उंचावण्यात आनंद मानतो. तो असा पिता आहे जो वाढ साजरी करतो, आपल्या सृष्टीशी स्पर्धा करणारा नाही.

जेव्हा शास्त्र म्हणते की देव "ईर्ष्यावान देव" आहे, तेव्हा त्याचा अर्थ मानवी, पापी अर्थाने मत्सर ज्यात ईर्ष्या, भीती किंवा मालकीची भावना असते असा होत नाही. देवाची ईर्ष्या प्रेम आणि विश्वासार्हतेतून येते. तो करार पाळणाऱ्या देवाचा हेवा आहे, जो आपल्या लोकांना नाश करणाऱ्या मूर्तींसोबत वाटून घेण्यास नकार देतो. जसा एक प्रेमळ जोडीदार योग्य रीतीने निष्ठेची इच्छा करतो, तसाच देव आपल्या हृदयांची इच्छा करतो तो काही कमी आहे म्हणून नाही, तर आपण स्वतःला ज्या गोष्टींना अर्पण करतो त्या शेवटी आपले नुकसान करतात हे त्याला माहीत आहे म्हणून. त्याचा हेवा संरक्षण करतो; तो कमी करत नाही.

देव बढाईखोर नाही. सर्व गोष्टींचा निर्माणकर्ता, सामर्थ्य आणि शहाणपणात परिपूर्ण असूनही, त्याच्याकडे बढाई मारण्याची सर्व कारणे असतानाही, तो आपली महानता दाखवून इतरांवर वर्चस्व गाजवत नाही किंवा घाबरवत नाही. उलट, देव आपले हृदय नम्रतेद्वारे प्रकट करतो. ख्रिस्तामध्ये आपण असा देव पाहतो जो स्वतःला उंचावण्याऐवजी स्वतःला रिकामे करतो. येशूने स्थान किंवा विशेषाधिकारांना घट्ट धरून ठेवले नाही, तर स्वेच्छेने दासाचे आणि पतित मानवाचे स्वरूप घेतले, आणि स्वतःला क्रूसावरील मृत्यूपर्यंत नम्र केले (फिलिप्पैकर २:५–८).

देव गर्विष्ठ नाही. येशू म्हणतो, "अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन. मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणांवर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे 'तुमच्या जिवांना विसावा मिळेल.' कारण माझे जू सोयीचे व माझे ओझे हलके आहे." — मत्तय ११:२८–३० येशू स्वतःच्या हृदयाचे वर्णन "सौम्य व लीन" असे करतो. हे एक आश्चर्यकारक विधान आहे. स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार असलेला तो स्वतःला कोमल आणि सहज जवळ येण्यासारखा म्हणून सादर करतो. देव आपल्याविषयी कठोर, फुगलेला किंवा दुर्लक्ष करणारा नाही. तो आपल्याला सहनशीलतेने आणि करुणेने भेटतो.

याच उताऱ्यात, येशू म्हणतो की त्याचे जू हलके आहे. पण याच्या उलट, जग आपल्याला एक जड आणि क्रूर जू वाहायला शिकवते जो हेवा, बढाई आणि गर्वाने बनलेला असतो. हा जू तुलना, स्पर्धा आणि सतत स्वतःचे संरक्षण करण्याची मागणी करतो. तो आपल्याला थकवतो. तो नातेसंबंध तोडतो आणि आत्म्यावर ओझे टाकतो. गर्व सामर्थ्याचे आश्वासन देतो, आणि एकटेपणा देतो.

येशू आपल्याला एक हलके जू देतो. तो आपल्याला जगाच्या मार्गाचे ओझे खाली ठेवायला आणि त्याचे जू उचलायला आमंत्रित करतो. त्याचे जू नम्रता, प्रेम आणि पित्यावरील विश्वासाने चिन्हांकित आहे. ते आपल्याला स्वतःला नाकारायला बोलावते, आणि त्याच्या बदल्यात तो आपल्याला थकवा नाही तर विश्रांती देतो. असा देव जो मत्सर करत नाही, बढाईखोर नाही, आणि गर्विष्ठ नाही त्याच्याबरोबर चालणे आपल्याला तसेच जगायला मोकळे करते म्हणजे प्रेमात सुरक्षित, नम्रतेत स्थिर, आणि कृपेत विश्रांती.

## प्रकरण 5 – देव आपल्याशी उद्धटपणे वागत नाही आणि स्वतःचा मार्ग लादत नाही

ती गैरशिस्त वागत नाही, स्वार्थ पाहत नाही, चिडत नाही, अपकार स्मरत नाही; १ करिंथ १३:५ देव आपल्याशी उद्धटपणे वागत नाही, तसेच तो आपल्याशी जबरदस्तीने किंवा हुकूमशाही पद्धतीने संबंध ठेवत नाही. तो भीतीद्वारे आज्ञाधारकता लादत नाही, दबाव टाकत नाही किंवा फसवणूक करून वश करत नाही. उलट, देव मानवजातीशी जसा व्यवहार करतो त्यामध्ये तो सौम्य, आदरशील आणि सहनशील आहे. तो सार्वभौम आणि सर्वशक्तिमान असतानाही, तो बलप्रयोगाऐवजी प्रेमाद्वारे कार्य करणे निवडतो. तो आपला अधिकार नेहमी करुणा, शहाणपण आणि आपल्या कल्याणाबद्दलच्या खोल काळजीसह वापरतो.

देव स्वतःचा स्वार्थ शोधत नाही. तो आज्ञाधारकता, विश्वास किंवा भक्ती यांची मागणी स्वतःतील कोणतीतरी उणीव किंवा असुरक्षितता भरून काढण्यासाठी करत नाही. शास्त्र स्पष्टपणे सांगते की देव स्वतःमध्ये पूर्ण आहे (प्रेषितांची कृत्ये १७:२४–२५). खरा उपासक आपल्या हृदयातील शुद्ध कृतज्ञता आणि आभारातून देवाची उपासना करतो. तो समजतो की देवाची प्रत्येक आज्ञा, आमंत्रण आणि दुरुस्ती ही त्याच्या प्रेमातून आणि आपले रक्षण करण्याच्या व आपल्याला आशीर्वाद देण्याच्या इच्छेतूनच वाहते. अनुवाद १०:१२–१३ आपल्याला आठवण करून देते की देव आपल्याला त्याच्या मार्गांत चालायला सांगतो, "तुमच्या स्वतःच्या भल्यासाठी."

येशू आपल्या पित्याचा हा सौम्य स्वभाव पूर्णपणे प्रकट करतो. त्याच्या पृथ्वीवरील सेवाकाळात, येशूने कधीही

स्वतःला कोणावर लादले नाही. त्याने आमंत्रण दिले, शिकवले, बरे केले आणि प्रेम केले पण लोकांना निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले. अनेक जण त्याला सोडून गेले तेव्हाही, येशू त्यांच्यामागे धावला नाही किंवा त्याने त्यांना थांबायला भाग पाडले नाही (योहान ६:६६–६७). उलट, त्याने मानवी निवडीचा सन्मान केला. हेच हृदय प्रकटीकरण ३:२० मध्ये दिसते, जिथे येशू म्हणतो, "पाहा, मी दाराशी उभा आहे आणि दार ठोठावतो आहे." तो आपल्या हृदयाचे दार तोडून आत शिरत नाही; तर तो आत येण्यासाठी आमंत्रणाची वाट पाहतो.

स्वर्ग आणि पृथ्वीचा प्रभू म्हणून आपला अधिकार वापरत असतानाही, देव आपल्या मुक्त इच्छेचा सन्मान करतो. अनुवाद ३०:१९ मध्ये देव आपल्या लोकांसमोर जीवन आणि मृत्यू, आशीर्वाद आणि शाप ठेवतो, आणि नंतर प्रेमाने त्यांना जीवन निवडण्यास प्रवृत्त करतो. हे वचन आपल्याला दाखवते की देव मार्गदर्शन करतो आणि इशारा देतो, पण तो जबरदस्ती करत नाही. तो आपल्याला स्वतःच्या प्रतिमेत निर्माण केलेल्या अस्तित्व म्हणून दिलेल्या प्रतिष्ठेचा सन्मान करतो. त्याचे नेतृत्व दडपशाहीचे नसून संबंधात्मक आहे अंध आज्ञाधारकतेची मागणी न करता विश्वासात आमंत्रण देणारे आहे.

देवाच्या आज्ञा कधीही मनमानी किंवा स्वार्थी नसतात. तो आपल्याकडून जे काही मागतो म्हणजे आज्ञाधारकता, विश्वास, पश्चात्ताप किंवा पूर्ण समर्पण तर ते तो यासाठी मागतो कारण त्याला माहीत आहे की त्यातूनच जीवन येते. स्तोत्र ८४:११ आपल्याला खात्री देते की "जे सरळ चालतात त्यांच्यापासून तो कोणतीही चांगली गोष्ट लपवत नाही." देवाचे हृदय नेहमी आपल्या कल्याणाकडे झुकलेले असते. आपण जे पाहू शकत नाही ते तो पाहतो, आणि ज्या वाटा त्या क्षणी आपल्याला आकर्षक वाटतात पण शेवटी आपले नुकसान करतात, त्यापासून तो आपले रक्षण करतो. जगात जिथे सत्ता व अनेकदा दडपण्यासाठी वापरली जाते आणि नातेसंबंध स्वार्थाने चालवले जातात, तिथे देव वेगळा उभा राहतो. तो उद्धट, कठोर, स्वार्थी किंवा मागणी करणारा नाही. तो आपल्या दुर्बलतेचा विचार करणारा, सहनशील आणि दयाळू आहे. त्याचे प्रेम धाक दाखवत नाही, तर आमंत्रित करते; दबाव टाकत नाही, तर प्रेमाने समजावते.

हे समजल्यावर आपण त्याच्यावर अधिक खोलवर विश्वास ठेवू शकतो, अधिक मोकळेपणाने स्वतःला समर्पित करू शकतो, आणि खात्रीने विश्रांती घेऊ शकतो की तो जे काही करतो ते आपल्यावरील प्रेमामुळेच करतो आणि स्वतःची सेवा करून घेण्यासाठी नव्हे.

## प्रकरण 6 – देव लवकर चिडत नाही, वाईटाचा विचार करत नाही

चिडत नाही, अपकार स्मरत नाही; १ करिंथ १३:५ देव रागावतो, पण तो सहज भडकणारा, उतावळा होणार किंवा अस्थिर नाही. शास्त्र पुन्हा-पुन्हा सांगते की प्रभू "कृपाळू आणि दयाळू आहे, राग करण्यास मंद आहे, आणि स्थिर

प्रेमात परिपूर्ण आहे” (स्तोत्र १४५:८). देवाच्या रागात आणि मानवी रागात खोल फरक आहे. मानवी राग बहुतेक वेळा प्रतिक्रियात्मक, भावनिक आणि स्वार्थी असते, आणि ते आपल्याला अनेकदा पापाकडे नेते. म्हणूनच बायबल आपल्याला इशारा देते: “राग करा, पण पाप करू नका” (इफिसकर ४:२६). आपला राग अनेकदा नियंत्रणाबाहेर जातो; देवाचा राग कधीही तसे करत नाही.

देव जेव्हा राग किंवा कोप व्यक्त करतो, तेव्हासुद्धा तो सहनशील, दयाळू, कृपाळू आणि करुणामयच राहतो. त्याचा राग कधीही क्रूर किंवा सूडबुद्धीचा नसतो. तो दुष्टतेविरुद्ध, अन्यायाविरुद्ध आणि सत्याच्या सतत नाकारण्याविरुद्ध दिलेला न्याय्य प्रतिसाद असतो. देवाचा कोप त्याच्या पवित्रतेतून आणि प्रेमातून वाहतो जखमी अहंकारातून किंवा चिडचिडीतून नाही. मानवी राग जसा वाढत जाऊन नाश करतो, तसा देवाचा राग नसून तो मोजलेला, हेतुपूर्ण आणि दयेद्वारे संयमित असतो (विलापगीत ३:३१–३३).

जेव्हा एखादा पापी वारंवार पाप निवडतो आणि उघडपणे जाहीर करतो की त्याला देवाशी काही देणेघेणे नाही, तेव्हा प्रभू स्वतःला त्याच्यावर लादत नाही. तो मानवी स्वातंत्र्याचा सन्मान करतो. अशा प्रसंगी, देव लोकांना त्यांनी हट्टाने निवडलेल्या मार्गावर चालू देतो. शास्त्र याचे वर्णन देव त्यांना “त्यांच्या इच्छांवर सोडून देतो” असे करते (रोमकर १:२४–२६). कधी कधी यामुळे दुःख येते; तर कधी कधी संपूर्ण नाश होतो. बायबल यालाच अनेकदा देव “आपले तोंड लपवतो” असे म्हणते (यशया ५९:२; स्तोत्र ३०:७). ही माघार क्रूरतेची कृती नसून, मानवी निवडीची गंभीर कबुली आहे. शास्त्र ज्याला देवाचा कोप म्हणते, ते अनेकदा लोकांनी त्याला नाकारण्याचे परिणाम अनुभवू द्यायचा देवाचा वेदनादायक निर्णय असतो.

तरीसुद्धा, देव नाशात आनंद मानत नाही. तो दुष्टाच्या मृत्यूत आनंद मानत नाही, तर त्यांनी फिरून जगावे अशी त्याची इच्छा असते (यहेज्केल १८:२३). त्याची सहनशीलता लोकांना निराशेकडे नव्हे, तर पश्चात्तापाकडे नेण्यासाठी आहे (रोमकर २:४).

देव आपल्याविषयी वाईटाचा विचार करत नाही, तसेच तो आपल्याला नंतर शिक्षा करण्यासाठी आपल्या चुकींची गुपचूप तपशीलवार नोंद ठेवत नाही. अनेक विश्वासू या भीतीत जगतात की देव त्यांच्या पापांचा साठा करून ठेवतो आणि योग्य वेळी तो ते आपल्याविरुद्ध वापरेल. पण शास्त्र वेगळेच सांगते. ख्रिस्तामध्ये, देव पूर्णपणे आणि निर्णायकपणे क्षमा करतो. “कारण मी त्यांच्या अनीतीच्या कृत्यांविषयी क्षमाशील होईन, आणि त्यांची पापे मी ह्यापुढे आठवणारच नाही” (इब्री लोकांस ८:१२). देव जेव्हा क्षमा करतो, तेव्हा तो पुन्हा आठवण काढत नाही, परत-परत उघड करत नाही, किंवा आपल्या डोक्यावर पापे धरून ठेवत नाही. कर्ज रद्द केले गेले आहे (कलस्सैकर २:१३–१४).

जे शेवटी नाश पावतील, त्यांच्याविषयी शास्त्र शिकवते की त्यांच्या पापांचा न्यायाच्या वेळी उलगडा होईल पण देवाने ती पापे शस्त्रासारखी साठवून ठेवली म्हणून नाही. उलट, त्यांची स्वतःची अंतःकरणेच त्यांच्याविरुद्ध साक्ष देतील. रोमकर २:१५ सांगते की त्यांचे अंतःकरण साक्ष देते, आणि त्यांचे विचार त्यांना दोषी ठरवतात किंवा निर्दोष ठरवतात. त्यांनी निवडलेल्या पापांनी घडवलेले आणि विद्रूप झालेले त्यांचे जीवनच नोंद ठरते. सुरुवातीपासून शेवटपर्यंत, देवाची इच्छा आपल्याला इजा करण्याची नाही, तर आपले उपचार करण्याची आहे. तो आपल्याविषयी वाईटाचा विचार करत नाही, आणि तो आपल्याला दुःख देण्याचे कट रचत नाही. त्याचे इशारेसुद्धा प्रेमाचीच कृत्ये आहेत. आजही आणि नेहमीच, देव आपल्यासाठी चांगलेच इच्छितो आपल्याला नाशापासून दूर बोलावून, जीवनाकडे, दयेकडे आणि पुनर्स्थापनाकडे नेण्यासाठी.

## प्रकरण 7 – देव अधर्मात आनंद मानत नाही, पण सत्यात आनंद मानतो

बायबल स्पष्टपणे उघड करते की देव पापात किंवा अधर्मात आनंद मानत नाही. शास्त्र आपल्याला सांगते, “प्रेम अनीतीत आनंद मानत नाही, तर सत्यासंबंधी आनंद मानते” (१ करिंथकर १३:६). देव प्रेम आहे (१ योहान ४:८), म्हणून हे वचन देवाच्या अगदी हृदयाचे प्रतिबिंब आहे. पाप देवाला आनंद देत नाही; उलट, ते त्याला दुःख आणि शोक देतो.

मानवी पाप देवावर किती खोल परिणाम करते याचे एक स्पष्ट चित्र आपल्याला उत्पत्ति ६ मध्ये दिसते. “पृथ्वीवर मानवांची दुष्टाई फार आहे, त्यांच्या मनात येणाऱ्या विचारांच्या सर्व कल्पना केवळ एकसारख्या वाईट असतात असे परमेश्वराने पाहिले” (उत्पत्ति ६:५). पुढील वचन देवाची भावनिक प्रतिक्रिया उघड करते: “म्हणून मानव पृथ्वीवर उत्पन्न केल्याचा परमेश्वराला अनुताप झाला आणि त्याच्या चित्ताला खेद झाला.” (उत्पत्ति ६:६). ‘खेद झाला’ हा शब्द खोल आणि तीव्र भावना व्यक्त करतो म्हणजे वेदना, शोक आणि क्लेश. यामुळे आपल्याला समजते की देव दूरस्थ किंवा भावनारहित नाही; मानव जेव्हा सतत पापात (ज्याला बायबल अधर्म म्हणते) पडतो, तेव्हा देव खोलवर प्रभावित होतो.

पण पाप देवाला इतके का दुखावते? कारण देवाला माहीत आहे की पाप आपल्याशी काय करते. पाप जीवन उद्ध्वस्त करते, हृदय भ्रष्ट करते, आणि लोकांना देव देऊ इच्छित असलेल्या आशीर्वादांपासून वेगळे करते. पाप अनेकदा झटपट आनंदाचे वचन देते, पण ते नेहमी दीर्घकालीन वेदना घेऊन येते. क्षणभर आनंददायक वाटणारी गोष्ट शेवटी तोटा, गुलामगिरी आणि दुःख निर्माण करते (रोमकर ६:२३). सैतान पापाचा सापळा म्हणून वापर करतो म्हणजे तात्पुरते समाधान देऊन लोकांकडून शांती, उद्देश आणि आध्यात्मिक जीवन हिरावून घेतो. देव दुःखी होतो कारण आपल्याआधीच त्याला शेवटचा परिणाम दिसतो.

याच्या उलट, देव सत्यात आनंद मानतो. सत्य देवाच्या स्वभावाचे प्रतिबिंब आहे आणि लोकांना स्वातंत्र्य व जीवनाकडे घेऊन जाते. येशू स्वतः म्हणाला, “मार्ग, सत्य आणि जीवन मीच आहे; माझ्यावाचून कोणीही पित्याकडे येत नाही” (योहान १४:६). सत्यात जगणे म्हणजे ख्रिस्तामध्ये जगणे. ख्रिस्ताबाहेरचे जीवन म्हणजे सैतानाच्या तात्पुरत्या राज्यात जगणे असे जीवन जे कदाचित कृत्रिम आनंदाने सुरू होते, पण शेवटी वेदना, आणि दुःख निर्माण करते (योहान १०:१०).

देव सत्यात आनंद मानतो म्हणून तो सत्यात जगण्याची इच्छा करणाऱ्यांना शोधतो. येशू म्हणाला, “तरी खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना करतील अशी वेळ येत आहे; किंबहुना आलीच आहे; कारण असे आपले उपासक असावेत अशीच पित्याची इच्छा आहे.” (योहान ४:२३). तो पुढे म्हणाला, “देव आत्मा आहे; आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे.” (योहान ४:२४). इथे येशू मानवी आत्म्याचा उल्लेख करतो, देवाच्या आत्म्याचा नव्हे. IRVMAR आवृत्तीत देवाच्या आत्म्याचा उल्लेख “आत्मा” अश्या मोठ्या अक्षरात केला आहे, आणि मानवी आत्म्याचा उल्लेख विशेषतः नवीन करारात वेगळ्या रीतीने केला आहे.

आत्म्यात आणि सत्यात देवाची उपासना करणे म्हणजे त्याचे प्रामाणिकपणे, संपूर्ण मनाने आणि प्रेमाने आज्ञापालन करणे. खरी उपासना फक्त शब्दांमध्ये किंवा विधींमध्ये नसते; ती आज्ञाधारकतेतून जगलेले जीवन असते. येशू म्हणाला, "जर तुम्ही माझ्यावर प्रेम करता, तर माझ्या आज्ञा पाळा" (योहान १४:१५). जे लोक सत्यात जगतात, ते भीतीपोटी नव्हे, तर देवावरील प्रेमामुळे आज्ञाधारकता निवडतात. अशा जीवनामुळे देवाच्या हृदयाला आनंद होतो, कारण तो आनंद मानतो जेव्हा त्याची मुले सत्यात चालतात (३ योहान १:४).

## प्रकरण 8 – देव सर्व काही सहन करतो, सर्व गोष्टींवर विश्वास ठेवतो, सर्व गोष्टींची आशा बाळगतो, सर्व काही सोसतो

देवाचे वचन जाहीर करते, "ती सर्वकाही सहन करते, सर्वकाही खरे मानण्यास सिद्ध असते, सर्वांची आशा धरते, सर्वांसंबंधाने धीर धरते." (१ करिंथकर १३:७). देव प्रेम आहे (१ योहान ४:८), म्हणून हे वचन फक्त प्रेम काय करते हेच उघड करत नाही, तर देव स्वतः मानवजातीविषयी काय करतो हेही प्रकट करते. ही चार विधानं देवाच्या सहनशीलतेची, दयाळूपणाची, आणि आपल्याला वाचवण्यासाठी असलेल्या त्याच्या अढळ वचनबद्धतेची खोली दाखवतात अगदी आपल्या दुर्बलतेतसुद्धा.

### देव सर्वकाही सहन करतो

देव काय सहन करतो? आपण केलेल्या प्रत्येक पापामुळे होणाऱ्या वेदना देव सहन करतो. पाप म्हणजे केवळ एखाद्या नियमाचे उल्लंघन नाही; ते देवाच्या हृदयावर झालेली जखम आहे. शास्त्र दाखवते की मानवी अवज्ञेमुळे देव खोलवर प्रभावित होतो. "मी तुमच्याखाली दाबला गेलो आहे, धान्याच्या पेंढ्यांनी गच्च भरलेला गाडा जसा खाली दबतो" (आमोस २:१३). प्रत्येक प्रकारचे पाप दुःख निर्माण करते मग ते बंडखोरी असो, गर्व असो, अप्रामाणिकपणा असो किंवा अविश्वास असो. एक प्रेमळ पिता म्हणून, देव हे दुःख सहनशीलतेने सहन करतो,

त्वरित न्यायाऐवजी दया निवडतो. “परमेश्वर दयाळू व कृपाळू आहे, तो मंदक्रोध व दयामय आहे.” (स्तोत्र १०३:८).

## देव सर्वकाही खरे मानण्यास सिद्ध असतो

शास्त्र असे का म्हणते की देव “सर्वकाही खरे मानण्यास सिद्ध असतो”? देव आपल्यावर विश्वास ठेवतो का? होय आश्चर्यकारकरित्या, तो ठेवतो. आपण पाप केल्यानंतर त्याच्याकडे परत येतो आणि प्रामाणिकपणे पश्चात्ताप करतो, “प्रभू, मी हे पुन्हा करणार नाही,” असे म्हणतो, तेव्हा देव आपल्यावर विश्वास ठेवणे निवडतो. आपली मानवी दुर्बलता आणि पुन्हा पडण्याची आपली असुरक्षितता त्याला माहीत असूनही, तो आपल्यावर विश्वास दाखवतो. “जर आपण आपली पापे कबूल केली, तर तो विश्वासू आणि न्यायी आहे की तो आपली पापे क्षमा करतो आणि आपल्याला सर्व अधर्मापासून शुद्ध करतो” (१ योहान १:९). उधळ्या पुत्राच्या पित्याप्रमाणे, देव आपल्याला संशयाने नव्हे, तर उघड्या बाहूंनी स्वीकारतो (लूक १५:२०). त्याचा विश्वास अज्ञानातून येत नाही तो दोषारोपाऐवजी दया निवडणारे प्रेम आहे.

## देव सर्वांची आशा धरतो

देव आशा का धरतो? आपण पश्चात्ताप केल्यानंतर पुन्हा पापात पडलो, तरी देवाचे हृदय दुःखी होते, पण तो आपल्याला सोडून देत नाही. तो आशा धरतो की आपण पुन्हा एकदा परत येऊ. तो आशा धरतो की आपण त्याच्यावर प्रामाणिकपणे प्रेम करू. तो आपल्या पुनर्स्थापनेची, आपल्या वाढीची, आणि त्याच्यासोबतच्या अनंत जीवनाची आशा धरतो. “कित्येक लोक ज्याला विलंब म्हणून म्हणतात तसा विलंब प्रभू आपल्या वचनाविषयी करत नाही, तर तो तुमचे धीराने सहन करतो; कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही, तर सर्वांनी पश्चात्ताप करावा अशी आहे.” (२ पेत्र ३:९). देवाची आशा नाश करण्याच्या इच्छेवर नाही, तर वाचवण्याच्या इच्छेवर आधारित आहे. आपण वारंवार अडखळलो तरी, कृपेमुळे आपण काय होऊ शकतो हे तो पाहतो.

## देव सर्वांसंबंधाने धीर धरतो

देव सर्वांसंबंधाने धीर का धरतो? कारण त्याला माहीत आहे की त्याच्या सहनशीलतेशिवाय मानवजातीचा नाश झाला असता. जर देवाने पापामुळे होणारे दुःख आणि वेदना सहनशीलतेने सहन केल्या नसत्या, तर न्याय त्वरित आला असता आणि कोणीही टिकू शकले नसते. “आम्ही भस्म झालो नाही ही परमेश्वराची दया होय, कारण त्याच्या करुणेस खंड पडत नाही.” (विलापगीत ३:२२). देव नकार, अवज्ञा आणि अविश्वास सहन करतो, जेणेकरून पाप्यांना परत फिरण्याची आणि तारण मिळवण्याची संधी मिळावी. शेवटी, देव सर्व काही सहन करतो याचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे वधस्तंभ जिथे ख्रिस्ताने आपली पापे वाहिली, जेणेकरून आपल्याला अनंत जीवन मिळावे (यशया ५३:५; रोमकर ५:८).

या सर्व गोष्टींमध्ये सहन करण्यात, विश्वास ठेवण्यात, आशा धरण्यात आणि टिकून राहण्यात आपण असा देव पाहतो ज्याचे प्रेम कधीही हार मानत नाही. त्याची सहनशीलता दुर्बल नाही; ती तारण कार्यरत असल्याचे चिन्ह आहे. “‘परमेश्वर मंदक्रोध, दयेचा सागर, अन्याय व अपराध ह्यांची क्षमा करणारा आहे” (गणना १४:१८).

## प्रकरण 9 – देव कधीही अपयशी ठरत नाही

प्रीती कधी अंतर देत नाही १ करिंथ १३:८

देवाचे प्रेम कधीही अपयशी ठरत नाही. MARVBSI बायबलच्या आणखी एका भाषांतरात असे म्हटले आहे की "प्रीती कधीच संपत नाही." याचा अर्थ असा की आपल्याविषयी देवाचे प्रेम काळ, निराशा किंवा मानवी अविश्वास यांमुळे कधीही कमकुवत होत नाही.

देव आपल्यावर कधीही हार मानत नाही असे म्हणणे म्हणजे त्याचे प्रेम आपल्याविषयी दृढ, निर्धारपूर्ण आणि अनंत आहे असे म्हणणे होय. शास्त्र जाहीर करते,
"आम्ही भस्म झालो नाही ही परमेश्वराची दया होय, कारण त्याच्या करुणेस खंड पडत नाही" (विलापगीत ३:२२).
काळाच्या सुरुवातीपासून आजपर्यंत, देवाने मानवजातीचा विश्वासू हृदयाने पाठलाग करणे कधीही थांबवलेले नाही.

हजारो वर्षांपासून एक आध्यात्मिक युद्ध सुरू आहे मानवी हातांनी लढल्या गेलेल्या कोणत्याही युद्धापेक्षा अधिक खरे आणि अधिक तीव्र. हे युद्ध देहाच्या शस्त्रांनी लढले जात नाही, तर विश्वास, सत्य आणि निष्ठा यांच्या क्षेत्रात लढले जाते. बायबल आपल्याला आठवण करून देते, "आपला संघर्ष देह आणि रक्ताविरुद्ध नाही, तर सत्तांशी, अधिकारांशी, या अंधकारमय जगाच्या अधिपतींशी आहे" (इफिसकर ६:१२). देवाने दोन हजार वर्षांपूर्वी क्रूसावर येशू ख्रिस्ताद्वारे सैतानाचा निर्णायक पराभव केला (कलस्सैकर २:१५). त्या विजयाने देवाच्या धार्मिकतेचा आणि प्रेमाचा प्रश्न कायमचा निकाली काढला.

देवाची प्रामाणिक इच्छा म्हणजे त्याच्या प्रत्येक वैयक्तिक मुलाला जिंकणे पण बळजबरीने नव्हे, तर प्रेमाने. प्रत्येक व्यक्तीने त्याचे राज्य स्वेच्छेने निवडावे अशी त्याची तळमळ आहे. "प्रभू आपल्या वचनाविषयी उशीर करत नाही... पण तो आपल्याविषयी दीर्घ सहनशील आहे, कोणाचाही नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही" (२ पेत्र ३:९). त्याचे प्रेम शेवटपर्यंत पुढे चालू राहते.

याच्या उलट, सैतान आपली सारी शक्ती एका मध्यवर्ती सत्यावर हल्ला करण्यासाठी वापरतो म्हणजेच देवाच्या स्वभावावर. तो अथकपणे काम करतो, जेणेकरून देव प्रेमळ, सहनशील, दयाळू, कृपाळू, भल्यामध्ये समृद्ध आणि विश्वासू आहे याबद्दल आपण शंका घ्यावी. येशूने सैतानाचा स्वभाव स्पष्टपणे उघड केला जेव्हा तो म्हणाला, "तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे." (योहान ८:४४). सैतानाचे सर्वात मोठे शस्त्र म्हणजे फसवणूक लोकांना देवावर विश्वास ठेवता येत नाही असे पटवून देणे.

म्हणूनच विश्वासाची परीक्षा घेतली जाते. सैतानाने देव खऱ्या प्रेमास अयोग्य आहे असा आरोप केल्यामुळे ईयोबाचा विश्वास कठोरपणे तपासला गेला (ईयोब १:९–११). तरीसुद्धा दुःखातून जात असताना ईयोब म्हणाला, "तो मला

ठार मारणार; तरी मी त्याची आस धरीन” (ईयोब १३:१५). येशू स्वतः अत्यंत परीक्षेतून गेला. क्रूसावर त्याने आक्रोश केला, “माझ्या देव, माझ्या देव, तू माझा त्याग का केलास?” (मत्तय २७:४६). हे शब्द येशूने सैतानाच्या खोट्यावर विश्वास ठेवून उच्चारले नव्हते, तर मानवी वेदना, भीती आणि दुःख यांच्याशी पूर्णपणे एकरूप होण्यासाठी त्याने ते उच्चारले. आपण अनुभवत असलेल्या सर्वात गडद अंधारात तो उतरला, जेणेकरून आपण ते कधीही एकटे अनुभवू नये.

येशूचे शेवटचे शब्द विश्वासाच्या अंतिम प्रतिसादाचे प्रकटीकरण करतात: “पिता, तुझ्या हातात मी माझा आत्मा सोपवितो” (लूक २३:४६). त्या क्षणी, भीती, शंका आणि दबाव आपल्याभोवती असताना काय करावे हे येशूने आपल्याला दाखवले म्हणजे पित्यावर पूर्णपणे विश्वास ठेवणे. हे शब्द “पिता, तुझ्या हातात मी माझा आत्मा सोपवितो” हे समर्पण, आत्मविश्वास आणि प्रेम यांची घोषणा आहे: तू माझा पिता आहेस. मी तुझ्यावर विश्वास ठेवतो. माझे जीवन आणि माझे भविष्य मी तुझ्या हातात ठेवतो.

जर एखादा मनुष्य शेवटी अनंत जीवन गमावतो, तर ते कधीही देवाने हार मानल्यामुळे नसते. शास्त्र स्पष्ट आहे: “देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला” (योहान ३:१६). अनेक जण अनंत जीवन गमावतील कारण ते देवाच्या प्रेमावर विश्वास ठेवण्याऐवजी देवाविषयी सैतानाच्या खोट्यावर विश्वास ठेवणे निवडतात. प्रेम (देव) कधीही हार मानत नाही पण आपण (देवाला) सर्वांपेक्षा अधिक निवडले पाहिजे.

देव जो प्रेम आहे, हेच आपण मानव अनुभवू शकणारी सर्वात महान गोष्ट आहे. पुढील प्रकरणात आपण पाहू की जीवनात विश्वास, आशा आणि इतर सर्व गोष्टींपेक्षा प्रेम का महान आहे.

## प्रकरण 10 – या तिघांपैकी सर्वात महान म्हणजे प्रेम

“सारांश, विश्वास, आशा, प्रीती ही तिन्ही टिकणारी आहेत; परंतु त्यांत प्रीती श्रेष्ठ आहे.” १ करिंथकर १३:१३

येथे प्रेरित पौलाचे शब्द आपल्याला दाखवतात की जेव्हा बाकी सर्व गोष्टी नाहीशा होतात, तेव्हा काय उरते. प्रेम, म्हणजे अगापे प्रेम. विश्वास, आशा आणि प्रेम ही फक्त जीवनाच्या काही विशिष्ट काळापुरती असलेली गुणवैशिष्ट्ये नाहीत; ती टिकून राहतात. ती “राहतात.” कारण ती देवाच्या अगदी स्वभावात रुजलेली आहेत आणि तो आपल्या लोकांना ज्या जीवनासाठी बोलावतो त्या जीवनात ती रुजलेली आहेत. तरीही, या तिन्ही टिकून राहणाऱ्या कृपांमध्ये, पौल धाडसाने जाहीर करतो की प्रेम इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे विश्वास आणि आशा अपुरी आहेत म्हणून नव्हे, तर प्रेम त्या दोन्ही गोष्टींना व्यापते, पूर्ण करते आणि सिद्ध करते म्हणून.

## विश्वास का टिकून राहतो?

विश्वास टिकून राहतो कारण मानवजातीला नेहमी देवावर विश्वास ठेवण्यास बोलावले जाईल. विश्वास म्हणजे अजून न दिसणाऱ्या गोष्टींकडे हात पोहोचवणे. “विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.” (इब्री लोकांस ११:१). परिस्थिती अनिश्चित असताना आणि शक्ती क्षीण वाटत असताना, विश्वास विश्वासणाऱ्याला सत्यात स्थिर ठेवते. विश्वासाद्वारे आपण देवाला ओळखतो, त्याच्या वचनांवर अवलंबून राहतो, आणि वाट स्पष्ट नसली तरी पुढे चालतो. “विश्वासाशिवाय देवाला संतोष देणे अशक्य आहे” (इब्री लोकांस ११:६), कारण विश्वासाद्वारेच आपण त्याच्याशी नात्यात प्रवेश करतो. तरीही, विश्वास स्वतःहून नेहमी स्वतःपलीकडे निर्देश करतो म्हणजे ज्याच्यावर आपण विश्वास ठेवतो त्याच्याकडे.

## आशा का टिकून राहते?

आशाही टिकून राहते कारण मानवी हृदय पुढे पाहण्यासाठी घडवलेले आहे. शास्त्र सांगते, “आशा लांबणीवर पडली असता अंतःकरण कष्टी होते, पण इष्टप्राप्ती जीवनाचा वृक्ष आहे.” (नीतिसूत्रे १३:१२). आशा आपली नजर वर्तमान दुःखापलीकडे उचलते आणि देवाची कथा अजून संपलेली नाही हे आपल्याला आठवण करून देते. ती आपल्याला वाट पाहण्यात टिकवते आणि परीक्षांमध्ये स्थिर करते. पौल लिहितो, “कारण आपण अशी आशा धरून तरलो; जी आशा दृश्य झाली आहे ती आशाच नव्हे. जे दृश्य झाले आहे त्याची आशा कोण धरील?” (रोमकर ८:२४). विश्वासाप्रमाणेच, आशा पुढे पोहोचते देवाने वचन दिलेल्या पण अजून पूर्णपणे उघड न झालेल्या भविष्याकडून जीवन घेत.

## प्रेम का टिकून राहते आणि ते सर्वात श्रेष्ठ का आहे?

प्रेम टिकून राहते कारण प्रेम अनंत आहे. शेवटी, आपला देव अनंत आहे. विश्वास आशा ठेवतो. आशा अपेक्षा करते. पण प्रेम नेहमी कृतीत असते ते अधिक जिवंत, अधिक रंगीबेरंगी आणि अधिक प्रभावी असते. आपण विश्वासाने देवाकडे हात पोहोचवतो किंवा आशेने तो काय करील याकडे पाहतो; पण प्रेम देव कोण आहे यामध्ये सहभागी होते. शास्त्र स्पष्टपणे जाहीर करते, “देव प्रेम आहे” (१ योहान ४:८). विश्वास आणि आशा या देवाला दिलेले प्रतिसाद आहेत, पण प्रेम हे त्याच्या स्वभावाचे मूळ स्वरूप आहे जे आपण येशूमध्ये अनुभवतो आणि त्याच्या प्रेमाला प्रतिसाद म्हणून परत व्यक्त करतो.

प्रेम सर्वात श्रेष्ठ आहे कारण ते देवाचे मूळ स्वरूप आहे आणि प्रत्येक खऱ्या कृतीमागील प्रेरक शक्ती आहे; त्यामुळे ते सर्वोच्च आणि सर्वात परिपूर्ण गुण ठरते. खरं तर, देवाच्या आत्म्याचे फळ म्हणजे प्रेम आहे, आणि त्या प्रेमातूनच इतर आठ गुण उत्पन्न होतात म्हणजे प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन अशा गोष्टींविरुद्ध कोणताही नियम नाही (गलातीकर ५:२२). लक्षात ठेवा, ते आत्म्याचे फळ आहे

एकवचनी. आत्म्याची फळे नाहीत.

याशिवाय, “प्रीतीच्या ठायी भीती नसते; इतकेच नव्हे तर पूर्ण प्रीती भीती घालवून देते; भीतीमध्ये शासन आहे आणि भीती बाळगणारा प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नाही.” (१ योहान ४:१८). याव्यतिरिक्त, प्रेम विश्वास आणि आशेला अर्थ देते. “मला संदेश देण्याची शक्ती असली, मला सर्व गुजे व सर्व विद्या अवगत असल्या, आणि डोंगर ढळवता येतील इतका दृढ माझा विश्वास असला, पण माझ्या ठायी प्रीती नसली, तर मी काहीच नाही.” (१ करिंथकर १३:२). प्रेमाविना विश्वास कठोर श्रद्धा बनतो. प्रेमाविना आशा स्वतःकडेच केंद्रित लालसा बनते. प्रेम हे सुनिश्चित करते की विश्वास करुणेमधून व्यक्त होतो, आणि आशा केवळ आपल्यासाठीच नव्हे तर इतरांसाठीही चिकाटी निर्माण करते. पौल दुसरीकडे लिहितो, “प्रीतीच्या द्वारे कार्य करणारा जो विश्वास त्याच्यात सामर्थ्य आहे.” (गलातीकर ५:६).

पौलाचे हे विधान विश्वास किंवा आशेला कमी लेखण्यासाठी नाही, तर प्रेमाला ख्रिस्ती जीवनाचे सर्वोच्च बोलावणे म्हणून उंचावण्यासाठी आहे. येशूने स्वतः हेच सत्य अधोरेखित केले जेव्हा तो म्हणाला, “तुमची एकमेकांवर प्रीती असली म्हणजे त्यावरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहात.” (योहान १३:३५). प्रेम हेच त्या गोष्टीचे पुरावे आहे की विश्वास जिवंत आहे आणि आशा खरी आहे. ते देवाला सर्वात स्पष्टपणे प्रतिबिंबित करते, अनंतकाळ टिकते, आणि ज्या प्रत्येक गोष्टीला ते स्पर्श करते ती रूपांतरित करते. पुढील प्रकरणात आपण पाहू की येशू आपल्याला एकमेकांवर प्रेम करण्यास का सांगतो.

## प्रकरण 11 – आपल्या संपूर्ण हृदयाने, मनाने, आत्म्याने आणि सामर्थ्याने प्रभूवर प्रेम करणे

लहानपणी, आपल्यापैकी बहुतेकजण दर संध्याकाळी वडील कामावरून घरी येण्याची दारात उभे राहून वाट पाहत असू. आपण मुख्यतः भेटवस्तू किंवा उपकार मिळावेत म्हणून वाट पाहत नव्हतो, तर फक्त आपल्या वडिलांवर प्रेम होते म्हणून वाट पाहत होतो. जेव्हा बाबा शेवटी घरी येत, थकलेले आणि धुळीने माखलेले, तेव्हा आपण लहान मुलांसारखे त्यांच्या कुशीत धावत जात असू. त्या मिठीत, वडिलांचा थकवा नाहीसा होत असे आणि त्याजागी आनंद येत असे; ते आपल्याला घट्ट मिठी मारत. आपले हसू, आपला आनंदी चेहरा आणि आपला निरागस बालस्वभाव त्यांच्या हृदयाला खोलवर स्पर्श करत असे तो परिपूर्ण होता म्हणून नव्हे, तर तो प्रामाणिक होता म्हणून.

याचप्रमाणे, देव आपल्याकडून प्रेम शोधतो. परिपूर्ण भक्ती नव्हे, तर त्याच्याकडे धावून जाणारे इच्छुक हृदय. तो या प्रेमात अत्यंत आनंद मानतो. याच कारणामुळे आपल्याला प्रभूवर प्रेम करण्यास बोलावले गेले आहे.

येशूने शिकवले की देवावर प्रेम करणे ही सर्वांत मोठी आज्ञा आहे. जेव्हा त्याला विचारले गेले की कोणती आज्ञा सर्वांत महत्त्वाची आहे, तेव्हा त्याने उत्तर दिले:

"“तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण बुद्धीने व संपूर्ण शक्तीने प्रीती कर." (मार्क १२:३०) ही आज्ञा ओझे नाही; ती एक आमंत्रण आहे. देव आपल्यातील केवळ एक भाग मागत नाही त्याला आपण संपूर्णपणे हवे आहोत, कारण त्याने आपल्याला संपूर्णपणे निर्माण केले आहे. देवावर पूर्णपणे प्रेम करणे आपल्या जीवनाला त्या उद्देशाशी जोडते ज्यासाठी आपली निर्मिती झाली आहे. जेव्हा आपले हृदय, मन, आत्मा आणि सामर्थ्य त्याच्यावर केंद्रित असते, तेव्हा इतर सर्व गोष्टी आपापल्या योग्य जागी येतात.

आता पाहूया की आपण आपल्या स्वर्गीय पित्यावर आपल्या संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण बुद्धीने व संपूर्ण शक्तीने कसे प्रेम करू शकतो.

## संपूर्ण मनाने देवावर प्रेम करणे

संपूर्ण मनाने किंव्हा हृदयाने देवावर प्रेम करणे म्हणजे आपल्या सर्वात खोल भावना, इच्छा आणि निष्ठा त्याला अर्पण करणे. मन म्हणजे आपण सर्वांत अधिक ज्या गोष्टीला मौल्यवान मानतो ते. देव अनेक प्रेमांपैकी एक प्रेम व्हावे अशी इच्छा करत नाही; तो आपले सर्वांत महान प्रेम व्हावा अशी त्याची इच्छा आहे.

“सर्व रक्षणीय वस्तूंपेक्षा आपल्या अंत:करणाचे विशेष रक्षण कर, कारण त्यात जीवनाचा उगम आहे." (नीतिसूत्रे ४:२३) जेव्हा आपले अंतःकरण देवाचे असते, तेव्हा आपल्या निवडी त्याच्या इच्छेचे प्रतिबिंब बनू लागतात. आपण भीतीमुळे नव्हे, तर प्रेमामुळे त्याला आनंद देण्याचा प्रयत्न करतो जसा एखादा मुलगा प्रेमळ पालकाला आनंद देण्याची इच्छा करतो.

## संपूर्ण जिवाने देवावर प्रेम करणे

संपूर्ण जिवाने देवावर प्रेम करणे म्हणजे त्याच्याविषयी विचार करणे, त्याचे वचन शिकणे आणि आपल्या विचारांचे नूतनीकरण त्याच्या सत्याप्रमाणे करणे हे निवडणे. विश्वास आंधळा नसतो; तो विचारपूर्वक आणि जाणूनबुजून असतो.

“ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या" (रोमकर १२:२)

जेव्हा आपण शास्त्रावर मनन करतो, देवाच्या भल्यावर चिंतन करतो आणि आपल्या विचारांवर शिस्त ठेवतो, तेव्हा आपले प्रेम अधिक खोलवर जाते. आपले मन असे ठिकाण बनते जिथे विश्वास बळकट होतो आणि विश्वासयोग्यता निर्माण होते.

## संपूर्ण आत्म्याने देवावर प्रेम करणे

आपला आत्मा म्हणजे आपले अंतःकरण आपली ओळख, भावना आणि आध्यात्मिक जीवन. आत्म्याने देवावर प्रेम करणे म्हणजे आपण कोण आहोत आणि आपण काय बनत आहोत हे सर्व त्याच्यावर विश्वासाने सोपवणे.

“हे माझ्या जिवा, परमेश्वराचा धन्यवाद कर, त्याचे सर्व उपकार विसरू नकोस." (स्तोत्र १०३:२) हे प्रेम उपासना, कृतज्ञता, पश्चात्ताप आणि देवावर अवलंबून राहण्यातून व्यक्त होते. हे शांत आश्वासन आहे की आपले जीवन त्याच्या हातात सुरक्षित आहे.

## संपूर्ण शक्तीने देवावर प्रेम करणे

संपूर्ण शक्तीने देवावर प्रेम करणे म्हणजे आपली कृती, वेळ, ऊर्जा आणि क्षमता त्याला अर्पण करणे. हे असे प्रेम आहे जे शब्दांपलीकडे जाऊन आज्ञाधारकतेत प्रकट होते.

"तुम्ही जे काही करता, ते सर्व देवाच्या गौरवासाठी करा." (१ करिंथकर १०:३१) इतरांची सेवा करणे, प्रामाणिकपणे जगणे, संकटात विश्वासात टिकून राहणे या सर्व गोष्टी संपूर्ण सामर्थ्याने देवावर प्रेम करण्याच्या अभिव्यक्ती आहेत. आपले दैनंदिन जीवन उपासनेचे कृत्य बनते.

आपण देवावर प्रेम करतो, कारण त्याने आधी आपल्यावर प्रेम केले. (१ योहान ४:१९) क्रूसाकडे पाहिल्यावर आपल्याला येशू ख्रिस्ताद्वारे ओसंडून वाहिलेले देवाचे प्रेम किती खोल आहे हे दिसते. त्याच्या कृपेची जाणीव आपल्यातील प्रेम जागृत करते. प्रार्थना, शास्त्र, उपासना आणि आज्ञाधारकता या देवाचे प्रेम कमावण्याच्या मार्ग नाहीत तर त्या त्याला दिलेल्या आपल्या प्रतिसादाचे मार्ग आहेत.

देव दूर किंवा उदासीन नाही. शास्त्र आपल्याला दाखवते की तो आपल्या लोकांमध्ये आनंद मानतो आणि त्यांच्यामध्ये हर्ष करतो. "परमेश्वर तुझा देव, साहाय्य करणाऱ्या वीरासारखा तुझ्या ठायी आहे; तो तुझ्याविषयी आनंदोत्सव करील; त्याचे प्रेम स्थिर राहील, तुझ्याविषयी त्याला उल्लास वाटून तो गाईल." (सफन्या ३:१७)

आपण देवावर प्रामाणिकपणे जरी अपूर्ण रीतीने प्रेम करतो, तरी तो ते आनंदाने स्वीकारतो. जसा एखादा पालक मुलाच्या साध्या प्रेमाच्या अभिव्यक्तीला मौल्यवान मानतो, तसे देव आपल्या भक्तीला जपतो. आपल्या प्रार्थना, उपासना आणि आज्ञाधारकता त्याच्यासमोर सुगंधी अर्पणासारखी उंचावतात.

संपूर्ण हृदयाने, मनाने, आत्म्याने आणि सामर्थ्याने प्रभूवर प्रेम करणे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तन घडवते. भीतीच्या जागी विश्वास येतो, गोंधळाच्या जागी उद्देश येतो, आणि रिकामेपणाच्या जागी आशा येते. हे प्रेम एखादा एक क्षण नाही, तर देवाजवळ अधिक जवळ जाण्याची आयुष्यभराची यात्रा आहे.

"तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवेभावे माझ्या शोधास लागाल, तेव्हा मी तुम्हांला पावेन." (यिर्मया २९:१३) आपले जीवन असे संपूर्ण समर्पित प्रेम प्रतिबिंबित करो जे देव फक्त स्वीकारत नाही, तर ज्यात तो आनंदही मानतो.

पुढील प्रकरणात, आपण पाहू की एकमेकांवर प्रेम करणे हे अप्रत्यक्षपणे देवावर प्रेम करणे कसे आहे.

## प्रकरण 12 – एकमेकांवर प्रेम करा

प्रेम हे ख्रिस्ती विश्वासाच्या अगदी केंद्रस्थानी उभे आहे. ते केवळ भावना किंवा अनुभूती नाही, तर देवाच्या आज्ञाधारकतेतून आणि इतरांची काळजी घेण्यातून वाहणारी जाणीवपूर्वक जगण्याची पद्धत आहे. येशूने हे अतिशय स्पष्टपणे सांगितले, जेव्हा तो म्हणाला, "मी तुम्हांला नवी आज्ञा देतो की, तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी; जशी मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करावी." (योहान १३:३४). ही आज्ञा प्रेमाला केवळ सूचना न ठेवता, ख्रिस्ताने आपल्यावर दाखवलेल्या निःस्वार्थ प्रेमाच्या नमुन्यावर आधारित एक पवित्र जबाबदारी बनवते.

एकमेकांवर प्रेम करणे म्हणजे इतरांना देवाच्या नजरेतून पाहणे. हे विश्वासूंना करुणा, सहनशीलता, नम्रता आणि क्षमाशीलतेने वागण्यास बोलावते. प्रेरित पौल या प्रेमाचे वर्णन व्यावहारिक शब्दांत करतो: "प्रीती सहनशील आहे, परोपकारी आहे; प्रीती हेवा करत नाही; प्रीती बढाई मारत नाही, फुगत नाही;" (१ करिंथकर १३:४). खरे प्रेम फक्त

शब्दांमध्ये उघड होत नाही, तर कृपेने आणि दयेमुळे परावर्तित होणाऱ्या सातत्यपूर्ण कृतींमधून दिसून येते अगदी ते कठीण असतानाही.

येशूने प्रेम केवळ मित्रांप्रतीच दाखवले नाही, तर नाकारलेले, तुटलेले आणि अगदी त्याचे शत्रू यांच्याप्रतीही दाखवले. त्याने शिकवले, "तुमच्या शत्रूंवर प्रेम करा, जे तुम्हाला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे भले करा" (मत्तय ५:४४). असे प्रेम मानवी सामर्थ्यापलीकडचे आहे; ते देवाच्या आत्म्याद्वारे सामर्थ्यवान होते. जेव्हा विश्वासू रागाऐवजी प्रेम, कटुतेऐवजी क्षमा निवडतात, तेव्हा ते जगासमोर ख्रिस्ताचा स्वभाव प्रतिबिंबित करतात.

बायबल शिकवते की प्रेम हे खऱ्या विश्वासाचे चिन्ह आहे. "तुमची एकमेकांवर प्रीती असली म्हणजे त्यावरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहात." (योहान १३:३५). आपली साक्ष केवळ तत्त्वज्ञानाने किंवा धार्मिक क्रियाकलापांनी स्थापित होत नाही, तर आपण एकमेकांशी कसे वागतो यावर ती उभी असते. प्रेम ख्रिस्ताच्या देहामध्ये ऐक्य निर्माण करते आणि विश्वासाबाहेर असलेल्यांसाठी सामर्थ्यवान साक्ष ठरते.

एकमेकांवर प्रेम करणे यामध्ये एकमेकांची ओझी वाहणेही समाविष्ट आहे. शास्त्र विश्वासूंना एकत्र चालण्यास, आधार आणि नम्रतेत राहण्यास प्रोत्साहित करते:
"एकमेकांची ओझी वाहा, आणि अशा प्रकारे ख्रिस्ताचा नियम पूर्ण करा" (गलातीकर ६:२). दुर्बलतेच्या, शोकाच्या किंवा अपयशाच्या क्षणी, प्रेम दोषारोपाऐवजी पुनर्स्थापनाने प्रतिसाद देते.

या प्रेमाचा स्रोत स्वतः देव आहे. "आपण त्याच्यावर प्रेम करतो, कारण त्याने आधी आपल्यावर प्रेम केले" (१ योहान ४:१९). येशू ख्रिस्ताच्या बलिदानाद्वारे प्रकट झालेले देवाचे प्रेम विश्वासूंना इतरांवर त्यागपूर्ण प्रेम करण्याची सामर्थ्य देते. आपण देवाच्या प्रेमात मुळावलेले राहिलो, तर आपण तेच प्रेम मोकळेपणाने आणि प्रामाणिकपणे पुढे वाढवू शकतो.

विभाजन, स्वार्थ आणि संघर्षाने भरलेल्या जगात, एकमेकांवर प्रेम करण्याचे बोलावणे आजही तितकेच महत्वाचे आणि तातडीचे आहे. जेव्हा विश्वासू प्रेमाची निवड करतात, तेव्हा ते ख्रिस्ताचा प्रकाश प्रतिबिंबित करतात आणि त्याची महान आज्ञा पूर्ण करतात. शास्त्र आपल्याला आठवण करून देते, "मुख्यतः एकमेकांवर एकनिष्ठेने प्रीती करा; कारण 'प्रीती पापांची रास झाकून टाकते.'" (१ पेत्र ४:८). प्रेम सर्वांत वर हेच ते बंधन आहे जे आपल्याला एकत्र ठेवते आणि जगाला पुन्हा देवाकडे निर्देश करते.

पण पुढील प्रकरणात आपण पाहणार आहोत की अब्जावधी लोकांना एकमेकांमध्ये देवाचे प्रेम अनुभवण्यापासून काय अडवत आहे.

## प्रकरण 13 – जगाचे प्रेम

प्रेम ही देवाने मानवी हृदयात ठेवलेली एक सामर्थ्यशाली शक्ती आहे. आपण जे प्रेम करणे निवडतो, ते शेवटी आपल्या जीवनाला, आपल्या मूल्यांना आणि आपल्या अनंत नियतीला आकार देते. शास्त्र विश्वासणाऱ्यांना वारंवार चुकीच्या ठिकाणी ठेवलेल्या प्रेमाबद्दल विशेषतः जगाच्या प्रेमाबद्दल इशारा देते. देवाने जग निर्माण केले आणि मानवजातीवर तो अतिशय प्रेम करतो, तरीसुद्धा बायबलमध्ये देव लोकांवर प्रेम करणे आणि देवाच्या विरोधात उभ्या असलेल्या सांसारिक व्यवस्थेला स्वीकारणे यामध्ये स्पष्ट फरक करतो.

हा फरक समजून घेणे, देवाला आवडणारे जीवन जगण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक विश्वासूसाठी अत्यावश्यक आहे.

बायबल जेव्हा “जग” या शब्दाचा उल्लेख करते, तेव्हा नेहमीच त्याचा अर्थ भौतिक पृथ्वी किंवा मानवजात असा नसतो. अनेक वेळा, तो अशा मूल्यप्रणालीकडे, इच्छा-आकांक्षांकडे आणि प्राधान्यांकडे निर्देश करतो ज्या देवाला बाजूला ठेवतात आणि स्वतःला, आनंदाला, गर्वाला आणि भौतिकवादाला उंचावतात.

जगावर व जगातल्या गोष्टींवर प्रीती करू नका. जर कोणी जगावर प्रीती करत असेल तर त्याच्या ठायी पित्याची प्रीती नाही. - १ योहान २:१५

हे वचन आपल्याला सांगते की जगाचे प्रेम आणि देवाचे प्रेम एकाच हृदयात टिकू शकत नाही. कारण जग देवाप्रती अधीनतेशिवाय समाधान, धार्मिकतेशिवाय यश, आणि पवित्रतेशिवाय आनंद यांचा प्रचार करते. ही सांसारिक व्यवस्था हळूच हृदयाला देवावरील भक्तीपासून दूर खेचते.

जगाच्या प्रेमाचे घटक

प्रेरित योहान जगाच्या प्रेमाची व्याख्या करणारे तीन मुख्य घटक ओळखून देतो:

कारण जगात जे सर्व आहे ते, म्हणजे देहाची वासना, डोळ्यांची वासना व संसाराविषयीची फुशारकी, ही पित्यापासून नाहीत, तर जगापासून आहेत; - १ योहान २:१६

१. देहाची वासना
याचा अर्थ अशी पापी इच्छा आणि लालसा ज्या देवाच्या इच्छेपासून वेगळ्या होऊन शरीराला समाधान देण्याचा प्रयत्न करतात. यामध्ये लैंगिक अनैतिकता, अतिरेक आणि भोग यांचा समावेश होतो, जे आत्मसंयमाऐवजी आत्मसुखाला स्थान देतात.

२. डोळ्यांची वासना
यामध्ये लोभाचा समावेश होतो आपण पाहतो पण ज्याची आपल्याला गरज नाही किंवा जे देवाने आपल्याला दिलेले नाही ते मिळवण्याची इच्छा. हे लोभ, मत्सर आणि असमाधान वाढवते.

३. संसाराविषयीची फुशारकी
हे प्रतिष्ठा, सत्ता, ओळख आणि आत्मउत्कर्ष यांचा पाठपुरावा आहे. हे गौरव देवाकडून दूर खेचते आणि मानवी यशावर केंद्रित करते.

देवावर प्रेम करणे आणि जगावर प्रेम करणे यातील संघर्ष हा विश्वासूंना भेडसावणाऱ्या सर्वात मोठ्या आध्यात्मिक लढ्यांपैकी एक आहे. शास्त्र स्पष्ट करते की जगाचे प्रेम हे निरुपद्रवी आकर्षण नाही, तर देवाप्रती आपल्या भक्तीशी थेट स्पर्धा करणारी शक्ती आहे. बायबल विश्वासूंना वारंवार त्यांच्या इच्छा, निष्ठा आणि जीवनशैली देवाच्या मुलांच्या ओळखीच्या प्रकाशात तपासण्यास बोलावते.

प्रेरित याकोब आपल्या आत आणि आपल्या भोवती असलेल्या अनेक संघर्षांचे मूळ उघड करतो: “तुमच्यामध्ये लढाया व भांडणे कशातून उत्पन्न होतात? तुमच्या अवयवांत ज्या वासना लढाई करतात त्यांतून की नाही?” - याकोब ४:१

जगाचे प्रेम हृदयात सुरू होते. सांसारिक इच्छा स्वार्थी महत्त्वाकांक्षा, मत्सर, गर्व आणि सुखभोग केवळ लोकांमध्येच नव्हे तर मानव आणि देव यांच्यातही संघर्ष निर्माण करतात. जगातील लोक नेहमीच धार्मिक जीवनामुळे होणाऱ्या

कोणत्याही असुविधेपासून आपले जीवन वाचवण्याचा प्रयत्न करतात.

पण येशू म्हणतो, “कारण जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो तो आपल्या जिवाला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरता आपल्या जिवाला मुकेल त्याला तो मिळेल. मनुष्याने सर्व जग मिळवले आणि आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ? अथवा मनुष्य आपल्या जिवाबद्दल काय मोबदला देणार?” - मत्तय १६:२५–२६

जगाच्या प्रेमातील सर्वात मोठ्या फसवणुकांपैकी एक म्हणजे कायमस्वरूपतेचा भास. जग परिपूर्णतेचे वचन देते, पण अनंत समाधान देऊ शकत नाही. शास्त्र सांगते, “आणि जग व त्याची वासना ही नाहीशी होत आहेत; पण देवाच्या इच्छेप्रमाणे करणारा सर्वकाळ राहतो.” - १ योहान २:१७

जग जे काही देते म्हणजे संपत्ती, कीर्ती, आनंद आणि सत्ता ते सर्व तात्पुरते आहे. जगावर प्रेम करणे म्हणजे हृदयाला नष्ट होणाऱ्या गोष्टींशी बांधून ठेवणे; तर देवावर प्रेम करणे म्हणजे आत्म्याला अनंत असलेल्या गोष्टींमध्ये स्थिर करणे. शास्त्र विभागलेल्या निष्ठेबद्दल जोरदारपणे बोलते. सांसारिक मानसिकतेला धरून ठेवत असताना देवावर पूर्णपणे प्रेम करणे अशक्य आहे. “जगाची मैत्री ही देवाबरोबर वैर आहे, हे तुम्हांला ठाऊक नाही काय? जो कोणी जगाचा मित्र होऊ पाहतो तो देवाचा वैरी ठरला आहे.” - याकोब ४:४

याचा अर्थ असा नाही की विश्वासूंनी समाजापासून दूर जावे; तर त्यांनी त्याची अधार्मिक मूल्ये स्वीकारू नयेत. ख्रिस्ती लोकांना जगात राहायला बोलावले आहे, पण जगाचे होण्यासाठी नाही.

जगाच्या प्रेमापासून स्वातंत्र्य मिळवण्याची सुरुवात मनाच्या परिवर्तनाने होते. देव आपल्या लोकांना विचार करण्याची आणि जगण्याची एक उच्च पद्धत स्वीकारण्यास बोलावतो. पौल म्हणतो, “देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वतःचे रूपांतर होऊ द्या.” रोमकर १२:२

देवाचे वचन आपल्या विचारांना आकार देऊ लागते तेव्हा आपल्या इच्छा बदलतात. जे कधी आपल्याला आकर्षित करत होते त्यांची पकड सैल होते, आणि जे देवाला आवडते तेच आपला आनंद बनते.

येशूने शिकवले की खरी सुरक्षितता आणि परिपूर्णता ही पृथ्वीवरील नव्हे, तर अनंत खजिन्यांमध्ये गुंतवणूक करण्यात आहे. “पृथ्वीवर आपल्यासाठी संपत्ती साठवू नका; तेथे कसर व जंग खाऊन नाश करतात आणि चोर घर फोडून चोरी करतात; तर स्वर्गात आपल्यासाठी संपत्ती साठवा; तेथे कसर व जंग खाऊन नाश करत नाहीत व चोर घरफोडी करत नाहीत व चोरीही करत नाहीत; कारण जेथे तुझे धन आहे तेथे तुझे मनही लागेल.” - मत्तय ६:१९–२१

देव जेव्हा आपले सर्वात महान प्रेम बनतो, तेव्हा जग आपल्यावर नियंत्रण ठेवण्याची शक्ती गमावते. आपण जे काही कमावतो किंवा आपल्या जवळ असते, ते त्याच्या राज्याच्या उभारणीसाठी वापरले जाते आणि दिले जाते. अशा प्रकारे आपण स्वर्गातील राज्यात आपला खजिना साठवतो.

जगाचे प्रेम सूक्ष्म, आकर्षक आणि धोकादायक आहे, पण ते देवाच्या प्रेमापेक्षा मोठे नाही. देवाचे प्रेम क्षमा, उद्देश, शांती आणि अनंत जीवन देते अशा गोष्टी ज्या जग कधीही देऊ शकत नाही.

देव लोकांवर प्रेम करतो, त्यांना गुलाम बनवणाऱ्या पापी व्यवस्थेवर नाही. विश्वासू म्हणून, आपल्याला पूर्ण मनाने देवावर प्रेम करण्यास, जगाचा उपयोग करण्यास पण त्याच्या मालकीचे न होण्यास, आणि एका श्रेष्ठ राज्याचे साक्षीदार म्हणून जगण्यास बोलावले आहे.

देवावर प्रेम करणे म्हणजे तात्पुरत्या गोष्टींपेक्षा अनंत गोष्टी निवडणे, लोकप्रियतेपेक्षा पवित्रता निवडणे, आणि देहाला समाधान देणाऱ्या गोष्टींपेक्षा देवाला आनंद देणाऱ्या गोष्टी निवडणे होय. पुढील दोन अध्यायांमध्ये, देव आपल्या सर्व प्रेमाचा आणि लक्ष्याचा हक्कदार का आहे, हे आपण शिकू.

## प्रकरण 14 – देव आणि मानव

सुरुवातीला आपण आपल्या स्वर्गीय पित्याविषयी चार सोप्या पण अत्यंत खोल सत्ये शिकलो:

१. देव प्रेम आहे (१ योहान ४:८; १ योहान ४:१६)

२. तो अनंतकाळापासून तसाच आहे (यशया ५७:१५; स्तोत्र ९०:२; प्रकटीकरण १:८)

**३. त्याचे मार्ग बदलत नाहीत (म्हणजे तो बदलत नाही) (मलाखी ३:६; इब्री लोकांस १३:८)**

**४. त्याच्यात बदल नाही, किंवा फिरण्याची सावलीही नाही (म्हणजे तो अगदी किंचितसुद्धा बदलत नाही) (याकोब १:१७)**

आज मी हे पुस्तक लिहित आहे ते तुम्हाला हे सांगण्यासाठी की बायबलमधील देव वरील सर्व गोष्टी असल्यामुळे, तो संपूर्ण विश्वात आणि त्याही पलीकडे अनंतकाळासाठी सर्वात विश्वासयोग्य, सहनशील, दयाळू, कृपाळू, प्रेमळ आणि न्यायनिरपेक्ष व्यक्ती आहे. एवढेच नव्हे, तर तो एकाच वेळी आपल्यासाठी सर्वकाही असतो. मी नेमके काय सांगू इच्छितो ते आता स्पष्ट करतो.

प्रेरित पौल १ करिंथकर १३:४–७ मध्ये आपल्याला प्रेमाचे जे चित्र देतो, ते आता आपल्याला माहीत आहे की देवाच्या स्वभावाचेच वर्णन आहे. तो म्हणतो,
“प्रेम सहनशील आहे, प्रेम दयाळू आहे.” याचा विचार करा देवाची सहनशीलता अनिच्छेने नाही, आणि त्याचा दयाळूपणा अटींवर आधारित नाही. तो एकाच वेळी आपल्याशी दयाळूही आहे आणि सहनशीलही आहे. देव आपली वाट पाहतो, आपल्या दुर्बलतेला सहन करतो, आणि आपल्याला सौम्यपणे दुरुस्त करतो त्याची सहनशीलता कधीही त्याच्या दयाळूपणापासून वेगळी होत नाही.

परंतु मानव म्हणून, आपले प्रयत्न अपुरे ठरतात. आपण दयाळू होण्याचा प्रयत्न करतो, पण लवकर आपली सहनशीलता हरवतो. किंवा आपण सहनशील होण्याचा प्रयत्न करतो, पण आपल्या शब्दांत आणि सुरांत दयाळूपणा नसतो. आपले प्रेम अनेकदा विभागलेले, विसंगत आणि इतरांनी आपल्याशी कसे वागले यावर अवलंबून असते. देवाच्या प्रेमात अशी कोणतीही असमतोलता कधीच नसते.

पौल पुढे म्हणतो, “प्रेम हेवा करत नाही” (१ करिंथकर १३:४). देव हेवा करत नाही, कारण त्याच्यात कोणतीही कमतरता नाही. तो इतरांना आशीर्वाद देण्यात आनंद मानतो आणि आपले भले इच्छितो. तो म्हणतो, “तुमच्याविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हांला तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत.” (यिर्मया २९:११). आपण मानव मात्र मत्सराशी खोलवर झगडतो. जे आपल्याशी वाईट वागतात ते समृद्ध होताना दिसले, तर आपल्या हृदयात कटुता वाढते. त्यांच्या भल्यात आनंद मानण्याऐवजी, आपण देवाच्या न्यायावर प्रश्नचिन्ह लावतो आणि मत्सराला मुळ धरू देतो.

शास्त्र आपल्याला हेही सांगते की प्रेम (देव) “बढाई मारत नाही, गर्विष्ठ नाही” (१ करिंथकर १३:४). देव कधीही बढाई मारत नाही, जरी गौरवाचा पूर्ण अधिकार फक्त त्याचाच असला तरी. त्याची महानता नम्रता आणि सेवेमध्ये प्रकट होते, जी सर्वात स्पष्टपणे ख्रिस्तामध्ये दिसून येते. “तो श्रीमंत असूनही, तुमच्यासाठी दरिद्री झाला” (२ करिंथकर ८:९). पण आपण मानव अनेकदा आपल्या प्रयत्नांमुळे यश मिळाल्यावर, किंवा इतरांना आपल्या मदतीमुळे लाभ झाला तर, बढाई मारतो. कृतज्ञतेऐवजी गर्व पटकन जागा घेतो.

पौल पुढे सांगतो की प्रेम “उद्धट नाही, स्वतःचा स्वार्थ शोधत नाही, लवकर रागावत नाही, आणि चुकीची नोंद ठेवत नाही” (१ करिंथकर १३:५). देव आपल्याशी व्यवहार करताना कधीही कठोर किंवा स्वार्थी नसतो. तो “राग करण्यास मंद आणि स्थिर प्रेमात परिपूर्ण” आहे (स्तोत्र १०३:८). आपल्यावर अन्याय झाला की आपण प्रत्येक अपराध काळजीपूर्वक लक्षात ठेवतो. पण देव पूर्णपणे क्षमा करतो: “त्यांची पापे आणि अधर्माची कृत्ये मी यापुढे आठवणार नाही” (इब्री लोकांस १०:१७).

कदाचित सर्वात मोठा विरोधाभास येथे दिसतो: “प्रेम अधर्मात आनंद मानत नाही, तर सत्यात आनंद मानते” (१

करिंथकर १३:६). आपल्याला दुखावणारे लोक पडताना मानव कधी कधी समाधान मानतो. देव मात्र वाईटात कधीही आनंद मानत नाही जरी ते त्याच्याविरुद्ध केले गेले असले तरीही. उलट, तो आपल्याला त्याच्यासारखे प्रेम करण्यास बोलावतो: “जे तुम्हाला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या... जे तुम्हाला त्रास देतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा” (मत्तय ५:४४). आपल्या सहनशीलतेची परीक्षा घेणाऱ्यांविषयी आपण वाईट विचार करतो; देव मात्र त्याच्याविरुद्ध उभे राहणाऱ्यांनाही आशीर्वाद देतो.

शेवटी, प्रेम “सर्व काही सहन करते, सर्वांवर विश्वास ठेवते, सर्वांसाठी आशा धरते, सर्व काही सहन करते” (१ करिंथकर १३:७). देव आपल्या लोकांवर कधीही हार मानत नाही. त्याचे प्रेम आपल्या अपयशांपलीकडे, आपल्या शंकांपलीकडे, आणि आपल्या पापांपलीकडे टिकून राहते. आपण मानव थकतो, निराश होतो, आणि सोडून देण्यास तयार होतो; देव मात्र विश्वासू राहतो.

शेवटी, पुन्हा एकदा मी तुम्हाला आठवण करून देऊ इच्छितो की देव वर नमूद केलेल्या या चारही मुद्द्यांप्रमाणे अनंतकाळासाठी आणि कधीही न बदलणारा असल्यामुळे, तो १ करिंथकर १३:४–८ मध्ये प्रेमाविषयी सतत सांगितलेल्या सर्व गुणधर्मांनी एकाच वेळी आणि सातत्याने आपल्याशी वागतो.

या प्रकरणात आपण एक स्पष्ट विरोधाभास पाहतो: देव परिपूर्ण प्रेम आहे; मानव प्रेमाचे तुकडे दाखवतो. पण हा विरोधाभास आपल्याला दोषी ठरवण्यासाठी नाही, तर आपल्याला न बदलणाऱ्या स्वर्गीय पित्याजवळ आणण्यासाठी आहे.

## प्रकरण 15 – देव आणि तुम्ही

हे प्रकरण तुमच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या नात्याबद्दल आहे म्हणजे - देव आणि तुम्ही.

तुम्ही देवाविषयी विचार करायच्या आधीच, तो तुमच्याविषयी विचार करत होता. शास्त्र म्हणते, “मी तुला गर्भात घडवण्यापूर्वी तुला ओळखले” (यिर्मया १:५). तुमचे जीवन अपघात नाही. तुम्ही देवाच्या जाणिवेत आहेस, त्याच्या दृष्टीत आहेस, आणि त्याने तुम्हाला उद्देशाने निर्माण केले आहे. तो तुमचे विचार, तुमचे संघर्ष, तुमचे भय आणि

तुमची आशा ओळखतो. “हे परमेश्वरा, तू मला पारखले आहेस, तू मला ओळखतोस.” (स्तोत्र १३९:१).

देव तुमच्या प्रेमाचा आणि लक्षाचा पात्र आहे, कारण त्याने आधी तुम्हाला आपले प्रेम दिले. “आपण प्रेम करतो, कारण त्याने आधी आपल्यावर प्रेम केले” (१ योहान ४:१९). त्याचे प्रेम तुमच्या परिपूर्णतेवर आधारित नाही, तर त्याच्या कृपेवर आधारित आहे. तुम्ही अत्यंत दुर्बल असतानाही, त्याने तुम्हाला सोडले नाही. “परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला.” (रोमकर ५:८).

देव दूरस्थ किंवा उदासीन नाही. तो तुमच्या जीवनाच्या प्रत्येक ऋतूत तुमच्या जवळ आहे. “परमेश्वर तुटलेल्या मनाच्या लोकांच्या जवळ आहे” (स्तोत्र ३४:१८). तो प्रत्येक अश्रू पाहतो आणि प्रत्येक न उच्चारलेली प्रार्थना ऐकतो. “तुमची सर्व चिंता त्याच्यावर टाका, कारण तो तुमची काळजी घेतो” (१ पेत्र ५:७). तुम्हाला एकटे वाटले, तरी तो विश्वासूच राहतो.

देव तुमच्या संपूर्ण हृदयाची मागणी करतो कारण त्याला त्याची गरज आहे म्हणून नव्हे, तर तुम्हाला त्याची गरज आहे म्हणून. येशू म्हणाला, “तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर पूर्ण अंतःकरणाने, पूर्ण जिवाने व पूर्ण मनाने प्रीती कर.” (मत्तय २२:३७). जेव्हा देव प्रथम स्थानावर असतो, तेव्हा इतर सर्व गोष्टी आपापल्या योग्य जागी येतात. “प्रथम देवाचे राज्य शोधा” (मत्तय ६:३३).

कधी तुम्हाला शंका आली की देव तुमच्या समर्पणाचा पात्र आहे की नाही, तर क्रूसाकडे पाहा. तिथे प्रेम सिद्ध झाले. “देवाने जगावर इतके प्रेम केले की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला” (योहान ३:१६). येशूने आपले जीवन दिले, जेणेकरून तुम्हाला क्षमा, स्वातंत्र्य आणि अनंत जीवन मिळावे. “आपल्या मित्रांसाठी प्राण देण्यापेक्षा मोठे प्रेम कोणाचेही नाही” (योहान १५:१३).

देव तुमच्याशी नाते इच्छितो केवळ रिकामी श्रद्धा नव्हे. “देवाजवळ या, म्हणजे तो तुमच्याजवळ येईल” (याकोब ४:८). तो तुम्हाला तुमच्या वर्तमान आणि तुझे भविष्य त्याच्यावर विश्वासाने सोपवण्यास आमंत्रित करतो. “आपल्या संपूर्ण हृदयाने परमेश्वरावर विश्वास ठेव” (नीतिसूत्रे ३:५). तुम्ही पाहू शकत नसतानाही त्याच्या योजना चांगल्याच आहेत. “कारण तुमच्याविषयी मी जे विचार करतो ते मला माहीत आहेत... ते तुम्हाला आशा आणि तुमच्या चांगुलपणाचे विचार आहेत” (यिर्मया २९:११).

हे पुस्तक संपताना देखील आमंत्रण कायम आहे. देव तुमच्या हृदयाच्या दाराशी उभा आहे. “पाहा, मी दाराशी उभा आहे आणि दार ठोठावतो; कोणी माझा आवाज ऐकून दार उघडले, तर मी त्याच्याकडे आत येईन” (प्रकटीकरण ३:२०). तो आरंभ आणि अंत आहे अल्फा आणि ओमेगा आहे (प्रकटीकरण १:८), तरीसुद्धा तो तुमचे नाव ओळखतो.

देव तुमच्या सर्व प्रेमाचा आणि लक्षाचा हक्कदार आहे, कारण फक्त त्याच्यामध्येच तुमच्या आत्म्याला खरी विश्रांती मिळते. “माझा आत्मा फक्त देवामध्येच विश्रांती पावतो” (स्तोत्र ६२:१). आणि इथूनच खरेतर सर्व काही सुरू होते.